www.lokrakshanay.com epaper.lokrakshanay.com dainiklokrakshanay@gmail.com +91 97023 86118



■ मतदान यंत्रे हॅक केली नाही तर, त्यात छेडछाड...
पान ३ वर....

दैनिक
# लोकरक्षणाय
प्रकाशन ठाणे सह एकाच वेळी प्रसारित - पालघर, मुंबई, पुणे, रायगड, सातारा, कोल्हापूर, नाशिक
लोकशाहीच्या संरक्षणार्थ



■ डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या ‘महापरिनिर्वाण...
पान ६ वर....

सहसंपादक - अनिकेत घनश्याम भंकाळ ■ वर्ष - ०२ ■ अंक १८४ ■ पृष्ठे- ०६ ■ ठाणे, गुरुवार, ०५ डिसेंबर २०२४ ■ रु. २/- ■ RNI.REG. NO. MAHBIL/2023/86118

## थोडक्यात

### उल्हासनगरमध्ये तरुणीचा विनयभंग करणाऱ्या टेलरला नागरिकांकडून चोप, गुन्हा दाखल



**उल्हासनगर** - जीन्स पॅन्टचे अल्टरेशन करण्यासाठी गेलेल्या तरुणीचा विनयभंग केल्या प्रकरणी संतप्त जमावाने टेलरला भररस्त्यात मारहाण केली. याप्रकरणी टेलरवर विनयभंगाचा तर ५ नागरिकांवर टेलरला मारहाण केल्याचा गुन्हा मध्यवर्ती पोलीस ठाण्यात दाखल झाल्याची माहिती वरिष्ठ पोलीस निरीक्षक शंकर अवताडे यांनी दिली.

### बाणेरमध्ये थाई मसाजच्या नावाखाली वेश्याव्यवसाय

**पुणे :** बाणेर भागात मसाज पार्लरच्या नावाखाली सुरू असलेल्या वेश्याव्यवसायावर गुन्हे शाखेने कारवाई केली. यावेळी पोलिसांनी तीन तरुणींना ताब्यात घेतले, तसेच मसाज पार्लरच्या चालकासह दोघांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मसाज पार्लरचा चालक सताउद्दीन मोहम्मद दिलावर हुसेन (२२, रा. जुनी सांगवी) याच्यासह अन्य एकजण अशी गुन्हा दाखल करण्यात आलेल्या आरोपींची नावे आहेत.

### एसटी बसचा अपघात, सुदैवाने जीवितहानी टळली



**कणकवली :** कणकवली तालुक्यातील मुंबई-गोवा महामार्गावर नांदगाव-ओटव फाटा येथील पुलावरील रस्ता दुभाजकाच्या संरक्षक कठड्याला आदळून पुणे ते ओरोस पर्यंत विद्यार्थ्यांची सहल घेऊन येणाऱ्या एसटी बसचा अपघात झाला. ही घटना काल, मंगळवारी मध्यरात्रीच्या सुमारास घडली. सुदैवाने या अपघातामध्ये कोणत्याही विद्यार्थ्याला गंभीर दुखापत झाली नसल्याने सर्वांनी सुटकेचा निःश्वास सोडला.

### सत्ता येताच, योजनेत बदल : लाडकी बहीण योजना



**मुंबई** - मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना महाराष्ट्र विधानसभा निवडणुकीत गेमचेंजर ठरली. राज्यातील दोन कोटी महिलांना या योजनेचा लाभ मिळाला होता. निवडणुकीआधी ज्या ज्या महिलांनी अर्ज केला, त्या सर्वांना प्रति महिना १,५०० रुपयांचा लाभ दिला गेला. तसेच निवडणुकीनंतर सत्ता आल्यास २,१०० रुपयांचा लाभ दिला जाईल, असे आश्वासन देण्यात आले होते. मात्र हे पैसे आता फक्त गरजवंत महिलांना मिळावेत, यासाठी हालचाली केल्या जात आहेत. त्यामुळेच अर्जदारांच्या अर्जाची छाननी प्रक्रिया राबविली जाणार आहे. अर्थ विभागातील सूत्रांनी दिलेल्या माहितीनुसार, लाडकी बहीण योजनेसाठी पात्र ठरलेल्या सर्वच महिलांच्या अर्जाची छाननी केली जाणार आहे. गरजू महिलांना अर्थसहाय्य करण्यात पारदर्शकता यावी, यासाठी ही पडताळणी करण्यात येणार आहे. पडताळणीमध्ये जे अर्जदार निकषांची पूर्तता करणारे नसतील त्यांना सदर योजनेतून बाद करण्यात येतील, असे सांगितले जाते.

## मी पुन्हा येईन...... मी पुन्हा येईन...... मी पुन्हा येईन......

# देवेंद्र फडणवीस घेणार तिसऱ्यांदा शपथ



● मुंबई, विशाल कारंडे :

**भाजपा नेते देवेंद्र फडणवीसच आता राज्याच्या मुख्यमंत्रिपदी विराजमान होणार आहेत, हे स्पष्ट झालं आहे. आज झालेल्या भाजपा कोअर कमिटी बैठक आणि भाजप विधीमंडळ पक्ष बैठकीत भाजपच्या विधीमंडळ पक्षनेतेपदी निवड करण्यात आली. त्यामुळे फडणवीस हेच मुख्यमंत्री होणार असल्याचं स्पष्ट झालं आहे.**


देवेंद्र फडणवीस म्हणाले, २०१९ ला आपल्याला जनतेचा कौल मिळाला होता. दुर्दैवाने जनतेचा कौल हिसकावून घेण्यात आला आणि जनतेशी बेईमानी झाली. मी त्या इतिहासात जात नाही एक नवीन सुरुवात आपण करतो आहे. पण या गोष्टीचा निश्चित उल्लेख करेन की २०१९ च्या अडीच वर्षांत आपल्याला, आपल्या आमदारांना, नेत्यांना त्रास देण्यात आला. तरीही कुणीही आपल्याला सोडून गेलं नाही.

२०१९ ते २०२२ या अडीच वर्षांच्या काळात एकही आमदार आपल्याला सोडून गेला नाही. सगळे आमदार, सगळे नेते संघर्ष करत होते. त्यानंतर २०२२ मध्ये आपलं सरकार आलं. त्यानंतर आता पूर्ण बहुमत मिळालं. महायुतीला २३० हून जास्त जागा मिळाल्या. हा इतिहास अभूतपूर्व असा आहे. मी देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे मी आभार मानेन. बूथ कार्यकर्ता म्हणून ज्याने सुरुवात केली अशा माझ्यासारख्या कार्यकर्त्याला मोदींनी संधी दिली. हा पक्ष नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात मोठा झाला आणि आपल्याला काम करण्याची संधी मिळाली त्यामुळे मी आदरणीय मोदी यांचे आभार मानतो. तसंच पक्षाचे अध्यक्ष जे. पी. नड्डा यांचेही आभार मानतो असं देवेंद्र फडणवीस म्हणाले.

पान २ वर

## पैलवान विक्रम पारखीचा हृदय विकाराच्या झटक्याने मृत्यू

● पुणे, अभिजित येरल्लू :



कुस्तीच्या आखड्यात शड्डू ठोकणार, मैदानात भल्याभल्यांना चितपट करणारा पैलवान विक्रम पारखी थोड्याच दिवसाच लगीन गाठ बांधणार होता. अंगाला हळद लागण्याची तारीखही ठरली होती. मात्र, नियतीला हे मान्य नव्हतं. कुमार महाराष्ट्र केसरीसह राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर मुळशीचे नाव करणारा विक्रम बुधवारी (दि.12) नेहमी प्रमाणे व्यायामाला गेला. पण त्याच वेळी त्याला हृदयविकाराचा झटका आला, यातच त्याचा मृत्यू झालाय. त्यामुळे अंगाला हळद लावण्याची तयारी सुरु असतानाच विक्रमचा हृदयविकाराच्या झटक्याने मृत्यू झालाय. विक्रमच्या जाण्याने कुस्तीक्षेत्रासह मुळशीवर शोककळा पसरलीये. पान २ वर

## मराठ्यांसमोर कोणतीही सत्ता, मस्ती टिकत नाही - मनोज जरांगे

● मुंबई, यश सावंत :

विधानसभा निवडणुकीत प्रचंड यश मिळाल्यानंतर अखेर महायुतीने राज्यपालांची भेट घेऊन सत्ता स्थापनेचा दावा केला आहे. तत्पूर्वी, भाजपाच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड करण्यात आली आहे. पक्ष निरीक्षक म्हणून राज्यात आलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या उपस्थितीत भाजपा विधिमंडळ आमदारांची बैठक पार पडली. या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले असून महाराष्ट्राचे पुढील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच असतील हे अखेर ठरले आहे. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह महायुतीच्या नेत्यांनी राजभवनावर जाऊन राज्यपालांची भेट घेतली आणि सत्ता स्थापनेचा दावा केला. यानंतर आता मनोज जरांगे पाटील यांनी आपली भूमिका स्पष्ट करताना १०० टक्के उपोषण करणार असल्याचे म्हटले आहे.

पत्रकारांशी बोलताना मनोज जरांगे पाटील म्हणाले की, मराठ्यांशी बेमानी करायची नाही. तुम्हाला आरक्षण द्यावे



लागणार आहे. सत्ता आली किंवा बहुमताने आलो म्हणून बेईमानी करायची नाही. पहिल्यासारखे लफड्यात पडायचे नाही. मराठ्यांपुढे कोणतीही सत्ता टिकू शकत नाही. एकदा का मराठा रस्त्यावर उतरला ना मग तुमचे काही खरे नाही. सत्ता आली म्हणून मस्तीत यायचे नाही. मस्ती मराठ्यांपुढे टिकत नाही आणि आम्ही ती टिकू देणारही नाही, असा स्पष्ट इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला. पान २ वर

### आझाद मैदानावर उपोषण होण्याची शक्यता आहे

■ १०० टक्के उपोषण होणार आहे. पण थोडे पुढे जायचे, असे काही लोक म्हणतात. आझाद मैदानावर उपोषण होण्याची शक्यता आहे. सामूहिक उपोषण होणार आहे. आरक्षण घेतल्याशिवाय आम्ही सोडणार नाही. प्रत्येकाला उपोषण करण्याचा अधिकार आहे. कधीच ओबीसी समाजाला विरोधक मानले नाही. सामान्य ओबीसींना एका शब्दाने दुखावले नाही. आम्हाला ओबीसींचा विरोध नाही. थोड्याफार नेत्यांचा विरोध आहे. धनगर आरक्षणाला धक्का लागत नाही, त्यांचे नेते विनाकारण आमच्या विरोधात जात आहेत. सगळ्या पक्षात आमचा मराठा समाज आहे. सगळ्या आमदारांना मराठे आता बोलायला लावणार, असा एल्गार मनोज जरांगे पाटील यांनी केला.

## ठाणे पुर्व सॅटीस पुल मार्गिका जोडणीसाठी रेल्वे घेणार दोन तासांचे १९ ब्लॉक

● ठाणे, रोहित जैसवाल :



ठाणे पुर्व स्थानक परिसरातील वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी राबविण्यात येत असलेल्या ‘स्थानक परिसर वाहतूक सुधारणा प्रकल्प’ (सॅटीस ) प्रकल्पामध्ये रेल्वे मार्गिकेच्या दोन्ही बाजूला उड्डाण पुलांची उभारणी झाली असली तरी त्याच्या जोडणीचे काम मात्र लांबल्याचे चित्र होते. दरम्यान, हे काम येत्या काही दिवसांत सुरू होणार असून त्यासाठी रेल्वे विभागाकडून रात्रीच्या वेळेत दोन तासांचे एकूण १९ ब्लॉक घेण्यात येणार आहेत. महिनाभरात हे काम पुर्ण केले जाणार असून यामुळे गेल्या काही महिन्यांपासून रखडलेल्या या कामाला आता वेग येताना दिसून येत आहे.

मध्य रेल्वेवरील या महत्त्वाच्या स्थानकातून रोज साडेसात लाख प्रवासी ये-जा करतात. या भागात होणारी वाहतूक कोंडीची समस्या सोडविण्यासाठी स्थानकाच्या पश्चिमेला सॅटिस पुलाची उभारणी करण्यात आली. यामुळे येथील कोंडी काही प्रमाणात कमी झाल्याचे चित्र आहे. गेल्या काही वर्षात ठाणे पुर्व स्थानक परिसरातही वाहतूक कोंडी होऊ लागली आहे. ठाण्यासह विविध परिवहन उपक्रमांच्या बोरिवली भागात जाणाऱ्या बसगाड्या येथून सुटतात. याशिवाय, खासगी बसगाड्याही येथूनच वाहतूक करतात. लांब पल्ल्यांच्या गाड्यांचा फलाट जवळ असल्यामुळे हे प्रवासी सुद्धा स्थानकाच्या पुर्व भागातून वाहतूक करतात. पान २ वर

## महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी देवेंद्र फडणवीस एक शिवभक्त म्हणून काम करतील - सुधीर मुनगंटीवार

● मुंबई, विशाल पाटील



विधानसभा निवडणुकीत प्रचंड यश मिळाल्यानंतर अखेर महायुतीने राज्यपालांची भेट घेऊन सत्ता स्थापनेचा दावा केला आहे. तत्पूर्वी, भाजपाच्या विधिमंडळ पक्षनेतेपदी देवेंद्र फडणवीस यांची निवड करण्यात आली आहे. पक्ष निरीक्षक म्हणून राज्यात आलेले गुजरातचे माजी मुख्यमंत्री विजय रुपाणी आणि केंद्रीय अर्थमंत्री निर्मला सीतारामन यांच्या उपस्थितीत भाजपा विधिमंडळ आमदारांची बैठक पार पडली. या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांच्या नावावर शिक्कामोर्तब झाले असून महाराष्ट्राचे पुढील मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीसच असतील हे अखेर ठरले आहे. देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे आणि अजित पवार यांच्यासह महायुतीच्या नेत्यांनी राजभवनावर जाऊन राज्यपालांची भेट घेतली आणि सत्ता स्थापनेचा दावा केला. पान २ वर

## अधिवेशनापूर्वी होतेय डायनिंग ची सोय बनतेय पुरुष आमदारांसाठी स्वतंत्र ‘डायनिंग रुम’

● नागपूर, नितीन देवळेकर :



राज्यातील सरकार अजून स्थापन झाले नसले तरी हिवाळी अधिवेशनाची तयारी मात्र जोरात सुरू आहे. आमदार निवासात दुरुस्तीसह इतर कामे सुरू आहेत. यातच येथील कॅन्टीनमध्ये महिला आमदारांप्रमाणे पुरुष आमदारांसाठीसुद्धा स्वतंत्र अशी डायनिंगची व्यवस्था केली जात आहे. अधिवेशनाच्या काळात आमदार निवासातील कॅन्टीनमध्ये बरीच गर्दी असते. त्यामुळे महिला आमदारांनी कॅन्टीनमध्येच स्वतंत्र डायनिंगची व्यवस्था करायची मागणी केली होती. त्यांची मागणी योग्य होती. त्यानुसार महिला आमदारांसाठी तशी स्वतंत्र डायनिंगची व्यवस्था करण्यात आली होती. तिथे एकाच वेळी आठ महिला आमदार बसून जेवण करू शकतील, अशी ती सुविधा आहे. दुसरीकडे पुरुष आमदारांसाठी अशी स्वतंत्र व्यवस्था नव्हती. कॅन्टीनमध्ये त्यांना इतरांसोबत बसूनच जेवण करावे लागायचे. त्यामुळे मागच्यावर्षीच पुरुष आमदारांनी डायनिंगची स्वतंत्र व्यवस्था करण्याची मागणी केली होती.

पान २ वर

## पालिकेपुढे आव्हान : हजार कोटींची करवसुली बाकी




● नवी मुंबई, भावना जैन :

नवी मुंबई महापालिकेमार्फत शहरात नव्या मालमत्तांचा शोध घेऊन उत्पन्नात भर पाडण्यासाठी वेगवेगळे उपाय आखले जात असले तरी येत्या आर्थिक वर्षात मालमत्ता करवसुलीचे एक हजार कोटी रुपयांचे लक्ष्य गाठण्याचे मोठे आव्हान महापालिकेपुढे असणार आहे. आर्थिक वर्षाला सहा महिने होऊन गेले तरी मालमत्ता कराची ३५० कोटी रुपयांची वसुली या विभागाने केली आहे. अखेरच्या काही महिन्यांमध्ये या वसुलीचा वेग वाढतो हे जरी स्पष्ट असले तरी महापालिका हा पल्ला कुठपर्यंत गाठू शकेल या विषयी साशंकता व्यक्त होत आहे.

मालमत्ता कर हा नवी मुंबई महापालिकेच्या उत्पन्नाचा मोठा स्रोत आहे. गेल्या आर्थिक वर्षात महापालिकेने ७१६ कोटी रुपयांच्या मालमत्ता कराची वसुली केली होती. २०२२-२३ या आर्थिक वर्षापेक्षा गेल्यावर्षी ८३.६६ कोटींनी अधिक मालमत्ता कर वसूल करण्यात आला होता. या आर्थिक वर्षात पालिकेने एक हजार कोटी रुपयांच्या मालमत्ता कर वसुलीचे लक्ष्य समोर ठेवले आहे. पान २ वर

### अभय योजनेचे प्रयोग

मालमत्ता कराची वसुली वाढावी यासाठी महापालिकेने थकबाकीदारांसाठी अभय योजना लागू केली होती. महापालिकेने मागील वर्षी १ ते २० मार्च या कालावधीत थकबाकीच्या दंडात्मक रककमेवर ७५ टक्के सवलत तसेच २१ ते ३१ मार्च या कालावधीत ५० टक्के सवलत लागू केली होती. या योजनेचा लाभ थकबाकीदारांनी मोठया प्रमाणावर घेतला. आठ हजार ७४० थकबाकीदारांनी ११६ कोटी इतकी रक्कम अभय योजनेच्या माध्यमातून महापालिकेच्या तिजोरीत भरली. यंदा लोकसभा तसेच विधानसभा निवडणुकीमुळे कर वसुलीवर परिणाम झाल्याचे चित्र असून या आर्थिक वर्षात ३५० कोटींचा मालमत्ता कर वसुल केला आहे.

■ नवी मुंबईकर नागरिकांनी शहराच्या प्रगतीत आपले योगदान देऊन पालिकेच्या माध्यमातून जास्तीत जास्त चांगल्या व दर्जेदार सेवा पुरवण्यासाठी मालमत्ता कर भरणा करावा. यावर्षी १ हजार कोटी मालमत्ता कर वसुलीचे लक्ष असून आतापर्यंत ३५० कोटी मालमत्ता कर्ज जमा केला आहे.

- शरद पवार, उपायुक्त, प्रशासन व मालमत्ता कर विभाग

## संपादकीय

संपादक - राकेश शंकर गोरे

# प्रदूषणामुळे जीवन-मरणाची परिस्थिती

दिल्लीतील प्रदूषणाने निर्माण झालेल्या जीवन-मरणाच्या परिस्थितीत नेमकं काय करावं, हा प्रश्न पडला आहे. दिल्ली सोडून जावं तर कुठं जावं? पोटापाण्याचं काय ? मुलांच्या शिक्षणाचं काय? आणि सध्याची ही स्थिती बदलायला किती वर्षे लागतील ? या दूषित वातावरणात राजधानीचा स्मार्टनेस कुठं गुदमरलाय अ- दिलदार दिल्लीचं 'दिल' कुठं हरवलंय, तेच कळत नाही. गेल्या पंधरवड्यात एका बाजूला 'महाराष्ट्रात निवडणुकांचा 'महा' धुरळा उडत होता, तर दुसरीकडे दिल्लीत प्रदूषणाचा 'महा' कहर सुरू झाला. भारताची राजधानी दिल्ली. इथं देशाचे सगळे महत्त्वाचे निर्णय होतात. पंतप्रधानांच्या कार्यालयासह सर्व मंत्रालये इथे आहेत. देशाचे आर्थिक अंदाजपत्रक इथेच तयार होते. सगळ्या योजनांना आकार देणारा, त्यासाठीचे निर्णय घेणारा नीती आयोग प्रत्येक प्रश्नाचा तपशीलवार अभ्यास करुन धोरणांचा गोषवारा इथेच ठरवतो. देशातील विविध प्रश्नांवर आलेल्या घटनात्मक पेचांवर विचारविमर्श करणारे सर्वोच्च न्यायालय इथेच आहे. शिवाय, देशाच्या प्रगतीसाठी कायदेकानून बनवणारी संसदही इथेच आहे. या पार्श्वभूमीवर दिल्लीच्या प्रदूषणाच्या गंभीर प्रश्नावर गेली कित्येक वर्षे उपाय का निघत नाही, हा सर्वसामान्यांना पडणारा प्रश्न आहे. 'नेमेचि येतो मग पावसाळा' या उक्तीप्रमाणे 'नेहमीच असते इथे प्रदूषण' अशी या प्रदूषणाची आम्हा सर्वांना सवय झाली आहे. पण, या प्रदूषणाच्या गंभीर प्रश्नामुळे संपूर्ण दिल्ली आणि आसपासच्या भागात राहणाऱ्या नागरिकांच्या आरोग्यावर होणाऱ्या दुष्परिणामांचा विचार केला तर संताप आल्याशिवाय राहात नाही. जगातील पहिल्या १५ अत्याधिक प्रदूषित शहरांमध्ये भारतातील किती शहरे असतील? अशी १२ शहरे आहेत. 'आयक्यू एअर' या स्विस संस्थेची २०२३ ची आकडेवारी पाहिली, तर आपली मान लज्जेने खाली जाते. दिल्ली सर्व प्रदूषित शहरांमध्ये तिसऱ्या क्रमांकावर, तर नवी दिल्ली सहाव्या क्रमांकावर आहे. ही आकडेवारी आणखी तपशिलात जाऊन पाहिली, तर पहिल्या ५० शहरांमधील ४२ शहरे भारतातील आहेत. जगातील अतिप्रदूषित देशांमध्ये भारताचा क्रमांक खूप वरचा आहे. पण, वास्तविकता अशी आहे की, कोणाला दोष द्यावा हेही कळत नाही. दिल्लीतील प्रदूषणाविषयी दरवर्षी होते तीच कंटाळवाणी आणि निष्फळ चर्चा सध्या सुरू आहे. एकदा नोव्हेंबर आला, थंडी पडू लागली की ही चर्चा सुरू होते. दिवाळीच्या आधी चिनी फटाक्यांवर निर्बंध घालण्याचा आणि दिवाळीच्या दिवसांत फटाके उडवण्यावर बंदी घालण्याचा न्यायालयाचा आदेश येतो. प्रमाण कमी झाले असले, तरी फटाके वाजतात म्हणजे वाजतातच. भारतीयांची मानसिकता समजणे अवघड आहे. शासनाचा आदेश पोलिसांची देखरेख, न्यायालयाचा निर्णय सरकारचे पूर्ण पानांचे वृत्तपत्रीय आवाहन आणि 'हे सर्व दंडनीय अपराध आहेत,' अशी सावधानीची सूचना असूनही लोक फटाके कुठून आणतात आणि कसे उडवतात, हेच कळत नाही. पुढे लग्नाचा मोसम येतो आणि फटाके उडतच राहतात. प्रदूषणाबरोबरच या सर्वांचा ज्येष्ठ नागरिक, आजारी व्यक्ती, गर्भवती स्त्रिया, परीक्षार्थी विद्यार्थी यांच्यावर होणाऱ्या परिणामांचा कुणीच कसा विचार करत नाही? आपण सगळे इतके बधीर आणि असंवेदनशील कसे झालो आहोत ? दिल्लीच्या प्रदूषणाला कारणीभूत घटक कोणते आहेत? औद्योगिक प्रदूषण, कचरा, वाहतुकीचे दुष्परिणाम, घरांमधील धुराने होणारे प्रदूषण, पाचोळा जाळणे आणि डिझेल जनरेटर्स आदी गोष्टी या समस्येच्या मुळाशी आहेत. आजकाल दिल्लीचा एक्यूआय ३०० - ४०० असा माणसाच्या आणि प्राणी-पक्षी या सर्वांच्या जिवाला धोकादायक आहे. दीड कोटीच्या वर वाहने असलेल्या या शहरात दिवसागणिक नवी वाहने वाढताहेत. दरवर्षी प्रदूषणाचे विक्रम मोडणारे असे शहर म्हणजे दिल्ली. यावर उपाय आहे का? हो. समस्त दिल्लीकरांना थंडीचे चार पाच महिने दिल्ली सोडावी किंवा राजधानी दिल्लीऐवजी नव्या राजधानीचा दिल्लीपासून दूर पर्याय शोधावा. पण, हे खरेच शक्य होईल? काहीच सांगता येत नाही. त्यामुळे तूर्त 'ठेविले अनंते तैसेचि रहावे'.

## आजची चित्रोळी



सरसर ही खाली वरती पळते
चंचल वाटे चित्त तिचे !
पण चंचल कुठलें मोका साधून
अचूक लक्षाला ती टिपते !!

मुकुंद कुलकर्णी, मुंबई

# फास्टफुड आरोग्यास घातक



आहारातील घटकांवर आरोग्य अवलंबून असते. रोजचा आहार चौरस असावा म्हणजे त्यात शरीराला आवश्यक असणाऱ्या सर्व पदार्थांचा समावेश असावा असे आहार शास्त्र सांगते. पण धावपळीच्या सध्याच्या काळात लोकांना स्वयंपाकासाठी आणि जेवणासाठी वेळ नाही मग आधार घेतला जातो तो फास्टफुडचा. अगदी लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच जण फास्टफुड आवडीने खातात. विशेत: शाळकरी मुलांना तर फस्टफुड म्हणजे पर्वणीच वाटते. घरी तयार केलेली भाजी पोळी खाताना किरकिर करणारे मुले फास्टफुड मात्र मिटक्या मारत खातात त्यामुळेच झटपट तयार होणारे आणि जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ सध्या भरपूर खपतात.

जिभेला हवेहवेसे वाटणारे हे पदार्थ प्रकृतीला मात्र चांगले नसतात. झटपट तयार होणाऱ्या या फास्टफुडमध्ये साखर आणि मीठ यांचे प्रमाण खूप असते शिवाय ते भरपूर तळलेले देखील असतात. अतीप्रक्रिया केलेल्या या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसतात त्यामुळे या पदार्थांपासून दूर राहावे असा सल्ला डॉक्टर आणि आहार तज्ज्ञ देत असतात तरी लोक त्यांचे ऐकत नाही. दोन वर्षांपूर्वी एका फास्टफुड बनवणाऱ्या जगप्रसिद्ध कंपनीने हे मान्य केले होते की ही कंपनी तयार करीत असलेल्या साठ टक्के पदार्थात आणि शितपेयांमध्ये शरीराला पौष्टिक असे काही नाही. या कंपनीचे नुडल्स आणि कॉफी हे दोन पदार्थ जगप्रसिद्ध आहेत. शिवाय चॉकलेट, केक, पास्ता, केचप, वेफर्स, कुरकुरे यासारखे विविध पदार्थ ही कंपनी बनवते. विशेष म्हणजे हे पदार्थ लहान मुलांमध्ये प्रचंड लोकप्रिय आहेत. पालकही मुलंच्या हट्टापायी हे पदार्थ मुलांना देतात. मुले हे पदार्थ मिटक्या मारत खातात. कंपनीने या पदार्थात कोणतेही पौष्टिक घटक नसल्याचे मान्य करूनही पालक फास्टफुड चा हट्ट सोडत नाही. काही पदार्थात तर शरीरास हानिकारक घटक असतात तज्ज्ञांनी ते संशोधनाअंती सिद्ध करून दाखवले आहे. ज्या फास्टफुड पदार्थात शरीरास हानिकारक घटक असल्याचे सिद्ध झाले ते घटक कंपनीने काढून टाकल्याचे मान्य केले मात्र अजूनही असे अनेक पदार्थ आहेत की ज्यात शरीरास हानिकारक असणारे घटक आहेत व ते पदार्थ बाजारात सर्रास विकले जात आहेत. काही जगप्रसिद्ध कंपन्यांवर असे आरोप आहेत की त्यांच्या पदर्थात शरीरास हानिकारक घटक आहेत तरीही या कंपन्यांच्या फास्टफुड पदार्थांची लोकप्रियता कमी झाली नाही उलट वाढतच चालली आहे. फास्टफुडमुळे मुलांना अनेक आजरांना सामोरे जावे लागत आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाण्यात आल्यास हृदयरोग, मधुमेह आणि स्थूलतेचा धोका आहे. अतिप्रमाणात फास्टफुड खाणाऱ्यांना कर्करोगासारखा असाध्य आजारही होऊ शकतो असे जाणकार सांगतात त्यामुळे पालकांनी मुलांना फास्टफुड पासून दूर ठेवायला हवे. फास्टफुड ऐवजी दूध, पोळी, पराठे, चटणी, कडधान्यांच्या उसळी, पोहे, उपमा यासारखे पौष्टिक पदार्थ पालकांनी मुलांना खायला द्यावेत. मुलांना चविष्ट पदार्थ देण्याऐवजी पौष्टिक पदार्थ खायला देणे ही पालकांची जबाबदारी आहे.

**श्याम ठाणेदार, पुणे**

# कौटुंबिक निष्ठेचे राष्ट्रकार्य



**सत्ताधीश पदाची शपथ घेताना राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रकार्य यांना प्राथमिकता देण्याचे वचन जनतेला देत असतो. अशावेळी लोकशाहीतील महत्त्वाचे तत्त्व असलेल्या न्यायाला धक्का लागणार नाही, याची काळजी घेण्याची जबाबदारी ही राज्यकर्त्यांची असते. मात्र, याठिकाणी राष्ट्रकार्य म्हणून बायडन यांनी कौटुंबिक निष्ठाच जपली, हेच खरे!**

राजासाठी संपूर्ण प्रजा हीच त्याचे अपत्य असते. त्यामुळे सगळ्यांवर सारखे प्रेम करतो, तोच राजगादीवर बसण्याच्या योग्यतेचा असतो, असे संकेत आहेत. मात्र, पुत्रप्रेमाचा मोह अनेक राज्यकर्त्यांना आवरता आलेला नाही. त्यामुळेच त्या राज्यांचे अथवा घराण्याचे पतन झाल्याचा इतिहास आहे. अशीच काहीशी पुत्रमोहाची लागण अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष जो बायडन यांना झाल्याचे चित्र आहे. त्यांनी राष्ट्राध्यक्षाच्या शक्तीचा वापर करून आपला मुलगा हंटर बायडन याला त्याच्यावरील सर्व प्रकारच्या गुन्ह्यांमधून निर्दोष मुक्त केले. त्यामुळे सद्यस्थितीमध्ये वडिलांची पुण्याईच हंटर यांच्या कामी आली आहे. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षपदाची सूत्रे सांभाळल्यानंतर मी माझ्या मुलाच्या सुटकेसाठी कोणत्याही माझ्या अधिकाराचा वापर करणार नसल्याचे बायडन यांनी जाहीर केले होते. मात्र, आता त्यावरून 'घुमजाव' करत हंटर बायडन यांच्यावरील सर्व गुन्हे मागे घेतले आहेत.

अर्थात, बायडन यांच्यावर या पुत्रमोहासाठी टीका होत असली, तरीही बायडन यांचे वागणे अमेरिकेच्या राज्यघटनेला धरूनच आहे. अमेरिकेच्या राज्यघटनेमध्ये 'कलम 2'मधील 'उपकलम 2'अन्वये महाभियोग नसलेल्या फेडरलशी संबंधित गुन्ह्यांबाबत संबंधित आरोपीला माफ करण्याचा अथवा शिक्षेत सवलत देण्याचा अधिकार अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षाला देण्यात आला आहे. अर्थात, काही गुन्हे हे नकळत किंवा कोणताही गुन्हा करण्याचा हेतू नसताना घडतात. मात्र, न्यायाच्या पातळीवर तो गुन्हाच असल्याने त्यास न्यायव्यवस्थेकडून शिक्षा होते. अशावेळी न्यायाचा चेहरा क्रूर असू नये, यासाठी न्यायदानाची शेवटची पायरी म्हणून हा अधिकार राष्ट्राध्यक्षांना राज्यघटनेने दिला आहे. भारतातदेखील राष्ट्रपतींना दयेचा अधिकार आहेच. मात्र, त्याचबरोबर याचा वापर नैतिकतेने करण्याचे अघोषित बंधनदेखील राष्ट्राध्यक्षांवर असते, याचेच भान बायडन यांना राहिलेले दिसत नाही. त्यामुळे बायडन यांचे वर्तन हे नियमाधीन असले, तरी त्यास नैतिकतेच्या पातळीवर योग्य म्हणता येणार नाही. उलटपक्षी त्यास अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांचे नैतिक अध:पतन म्हणणेच यथोचित ठरेल.

हंटर बायडन याच्यावर अमेरिकेमध्ये करचुकवेगिरी आणि शस्त्र कायद्याच्या उल्लंघनाचे गंभीर आरोप होते. जवळपास १२ गुन्हे असे होते, ज्यामध्ये हंटर दोषी आढळले असते, तर त्यांना किमान ४२ वर्षांची शिक्षा अमेरिकेच्या न्यायप्रणालीनुसार झाली असती. मात्र, त्याआधीच बायडन यांच्या निर्णयाने ते दोषमुक्त झाले आहेत. हंटर यांच्याविरोधातील गुन्हे मागे घेताना बायडन यांनी स्पष्टीकरण दिले की, राष्ट्राध्यक्षपदाच्या चार वर्षांच्या कार्यकाळात मी हंटरला नैसर्गिक न्याय मिळावा, यासाठी वाट पाहिली. मात्र, सगळेचजण त्याला कशा पद्धतीने यात अधिक अडकवले जाईल, याचेच प्रयत्न करत असल्याचे दिसून आले. सिंहासनावर बसणाऱ्यांकडून जनतेला सिंहासारखीच वर्तवणूक अपेक्षित असते, कोल्ह्यासारखी नाही, याचाच विसर बायडन यांना इथे पडलेला दिसतो. अमेरिकेमध्येही बायडन यांच्या या कृतीवर अनेक कायदे तज्ज्ञांनी आक्षेप घेतला आहे. अनेक तज्ज्ञांनी तर बायडन यांच्या कृतीची न्यायाचा बाजार म्हणत अवहेलनादेखील केली आहे. या सगळ्या बाबींमधील सर्वात महत्त्वाचा मुद्दा आज ठळक झाला, तो म्हणजे बायडन यांना स्वतःलाच अमेरिकेच्या न्याययंत्रणेवर विश्वास नाही. ज्याच्या नावे न्यायदानाचे कार्य अविरत न्याययंत्रणा चालवत असते. त्या यंत्रणेवरच जर राष्ट्राध्यक्षांचा विश्वास नसेल, तर अमेरिकेतील प्रजासत्ताकाचे भविष्य अंधकारमय होण्याच्या मार्गावर आहे, असे म्हणणे अतिशयोक्तीचे होणार नाही. जगाला लोकशाहीचे धडे देण्यात सदोदित आनंद मानणाऱ्या अमेरिकेमध्ये लोकशाहीमध्ये सत्ता ही जनसेवेसाठी असते, याचाच विसर पडला असून अमेरिकेमध्ये ती सध्या कौटुंबिक आश्रयदात्री झाल्याचे चित्र आहे. त्यामुळेच जो बायडन यांची कृती राजकीय आणि नैतिक दोन्ही पातळींवरही निषेधार्हच. एखादा सत्ताधीश पदाची शपथ घेताना राष्ट्रनिष्ठा, राष्ट्रकार्य यांना प्राथमिकता देण्याचे वचन जनतेला देत असतो. अशावेळी लोकशाहीतील महत्त्वाचे तत्त्व असलेल्या न्यायाला धक्का लागणार नाही, याची काळजी घेण्याची जबाबदारी ही राज्यकर्त्यांची असते. मात्र, याठिकाणी राष्ट्रकार्य म्हणून बायडन यांनी कौटुंबिक निष्ठाच जपली, हेच खरे!

## पान १ वरून...

### ▶▶| देवेंद्र फडणवीस घेणार तिसऱ्यांदा शपथ...

अमित शाह यांचेही विशेष आभार मानतो-फडणवीस

महाराष्ट्रात आपल्याबरोबर, कार्यकर्त्यांबरोबर राहून ज्यांनी आपल्याला ताकद दिली ते देशाचे गृहमंत्री अमित शाह यांचे, तसंच भाजपाच्या सगळ्याच नेत्यांचे मी मनापासून आभार मानतो. राज्यातले कार्यकर्ते आणि नेते यांनी आपल्याला जी मदत केली त्यांचेही मी आभार मानतो. महाराष्ट्र भाजपा पूर्ण ताकदीने मैदानात उतरला होता. महाराष्ट्रातल्या भाजपाच्या सगळ्या टीमचं मी अभिनंदन करतो. तुम्ही सगळे आहात म्हणून मी इथे आहे असंही देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे. पुढची वाट ही अपेक्षा पूर्ण करण्यासाठी संघर्षाची आहे. आपलं महायुतीचं सरकार आहे. एकदिलाने सगळ्या मित्रांना बरोबर घेऊन पुढे जायचं आहे. सगळ्यांच्या मनातल्या सगळ्या गोष्टी पूर्ण करता येत नाहीत. आपण एक मोठं लक्ष्य घेऊन या ठिकाणी आलो आहोत. येत्या काळात चार गोष्टी मनासारख्या झाल्या तर चार गोष्टी मनाविरुद्धही होतील तरीही आपण संपूर्ण शक्तीने काम करु असं आवाहन देवेंद्र फडणवीस यांनी म्हटलं आहे.

### ▶▶| अधिवेशनापूर्वी होतेय डायनिंग ची सोय...

तेव्हा पुढच्या अधिवेशनात ही व्यवस्था देण्याचे आश्वासन देण्यात आले होते. त्यानुसार आता तशी व्यवस्था केली जात आहे. कॅन्टीनला लागून असलेल्या जागेवर एका बाजूला पुरुष आमदारांसाठीसुद्धा स्वतंत्र डायनिंगसाठी केबीन तयार केले जात आहे. २० फूट लांब व ८ फूट रुंद हे केबीन पुरुष आमदारांसाठी राहील. यात सोफे लावण्यात येतील. एका वेळी ८ आमदार येथे बसून भोजन करू शकतील.

### ▶▶| पालिकेपुढे आव्हान : हजार कोटींची...

आतापर्यंत मालमत्ता कर विभागाने ३५० कोटी रुपयांचा मालमत्ता कर वसूल केला आहे. यंदा महापालिका प्रशासनाने मालमत्ता कर थकबाकीदारांवर लक्ष केंद्रीत केले आहे. थकबाकी रकमेनुसार उतरत्या क्रमाने याद्या तयार करण्यात आल्या आहेत.

### ▶▶| ठाणे पुर्व सॅटीस पुल मार्गिका जोडणीसाठी...

यामुळे गेल्या काही वर्षात येथे वाहतूक कोंडीची निर्माण झाली आहे. ही समस्या सोडविण्यासाठी पश्चिमेच्या धर्तीवर 'स्मार्ट सिटी' योजनेतून स्थानकाच्या पूर्वेला सॅटीस प्रकल्पाची उभारणी करण्यात येत आहे. सुमारे २६० कोटी रुपयांचा हा प्रकल्प आहे.

ठाणे महापालिका प्रशासनाने मोठा गाजावाजा करत हाती घेतलेल्या सॅटिस प्रकल्पात विविध अडथळे आले. प्रकल्पाचा आराखडा बदल आणि त्यासाठी आवश्यक असलेल्या परवानग्या यामुळे हा प्रकल्पाच्या कामास विलंब झाला. या जागेवरील रेल्वे विभागाची बांधकामे, शौचालये तसेच इतर अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईत बराच कालावधी लागला. यामुळे स्थानकाच्या पूर्वेला डेक उभारणीचे काम रखडले होते. दरम्यान, गेल्या काही महिन्यांपासून हे काम वेगाने सुरू आहे. तसेच या प्रकल्पातील रेल्वे रुळांवरील पूलजोडणीचे काम शिल्लक होते. रेल्वेच्या ओव्हर हेड वायरच्या खांबाची उंची कमी करण्याच्या कामासाठी पालिकेने रेल्वे विभागाकडे काही महिन्यांपुर्वी १ कोटी ९० लाख रुपये जमा केले होते. हे काम रेल्वे विभागाने नुकतेच पुर्ण केले आहे. आता पुढच्या टप्प्यात पुल जोडणीचे काम हाती घेतले जाणार आहे. ठाणे पुर्व सॅटीस प्रकल्पातील रेल्वे मार्गिकेवरील पुल जोडणीसाठी एकूण सहा गर्डर टाकण्यात येणार आहेत. या कामासाठी पालिकेने रेल्वे विभागाला एक पत्र पाठविले आहे. या पुलाच्या कामासाठी रात्रीच्या वेळेत दोन तासांचे एकूण १९ ब्लॉक घ्यावे लागणार असून त्याचे नियोजन करण्याचे काम रेल्वे विभागामार्फत सुरू आहे. त्यामुळे येत्या काही दिवसांत रेल्वे विभागाकडून या कामाला मंजुरी दिली जाणार आहे. महिनाभरात हे काम पुर्ण केले जाणार आहे. या प्रकल्पात तुळजा भवानी मंदिर, पूर्व द्रुतगती महामार्गावरील सेवा रस्ता ते कोपरी कन्हैया नगर, एमजेपी कार्यालयापर्यंत एकूण २.२४ किमी लांबीचा उन्नत मार्ग. यात १२ मीटर रुंद मार्गिका. स्थानकात वाहतूक व्यवस्थापनासाठी ९ हजार चौरस मीटर डेक उभारणी. डेक उन्नत मार्गाला जोडण्यात येणार असून त्यात 'स्टेशन बिल्डिंग'चाही समावेश असेल. ठाणे पूर्व सॅटिस प्रकल्पातील रेल्वे मार्गिकेवरील पुल जोडणी कामाबाबत रेल्वे विभागासोबत नुकतीच एक बैठक झाली असून त्यानुसार रेल्वे विभागाला एक पत्रही पाठविण्यात आले आहे. रेल्वे विभागाकडून येत्या काही दिवसांत परवानगी मिळताच कामाला सुरुवात होईल. संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त, ठाणे महापालिका

### ▶▶| मराठ्यांसमोर कोणतीही सत्ता, मस्ती...

**मराठा समाजाला आरक्षण मिळल्याशिवाय सुट्टी नाही**

शुभेच्छा न द्यायला ते काही आमचे शत्रू नाहीत. त्यामुळे त्यांचे अभिनंदन करतो आणि शुभेच्छा देतो. महाराष्ट्रात आमची संस्कृती आहे. आम्ही विरोध पण करतो आणि मोठ्या मनाने शुभेच्छा देतो. मराठा समाजाला आरक्षण मिळल्याशिवाय सुट्टी नाही. आंतरवाली सराटीमध्येच सामूहिक आमरण उपोषण होणार आणि ते खूप भव्य दिव्य होणार. असे आंदोलन कोणी बघितले नसेल असे ते सामूहिक आमरण उपोषण होईल. मात्र आरक्षण घेतल्याशिवाय मी कोणालाही सोडणार नाही, असा इशारा मनोज जरांगे पाटील यांनी दिला.

दरम्यान, काही केले तरी आम्हाला संघर्ष करावा लागणार आहे. लढावे लागणार आहे. आमचा चळवळीवर विश्वास आहे. कोणीही मुख्यमंत्री झाले, सरकार कुणाचे असले तरीही मुंडक्यावर पाय देऊन आरक्षण घेणार, अशी ठाम भूमिका मनोज जरांगे यांनी घेतली.

### ▶▶| पैलवान विक्रम पारखीचा हृदय विकाराच्या...

१२ डिसेंबर रोजी होणार होता विक्रमचा विवाह हृदय विकाराचा झटका आल्यानंतर काही क्षणात विक्रमने अखेरचा श्वास घेतलाय. विक्रम मुळशीतील माण या गावचा कुस्ती क्षेत्रात मेहनत आणि कसरत घेत नाव कमावलेल्या पैलवानाने वयाच्या तिशीतचं जगाचा निरोप घेतलाय. विक्रमचा १२ डिसेंबर विवाह होणार होता, मात्र संसाराच्या आखाड्यात उतरण्यापूर्वीच तो आयुष्याच्या आखाड्यातचं चितपट झालाय. विक्रमने राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय पातळीवर शड्डू ठोकत अनेक किताब पटकावले होते. पुढं ही अनेक आखाडे गाजविण्याची क्षमता विक्रममध्ये होती, मात्र नियतीला काही हे मान्य नव्हतं. अनेक पैलवानांना चितपट करणाऱ्या विक्रमला हृदयविकाराच्या झटक्याने गाठले अन् यातच त्याचा मृत्यू झालाय. . त्याच्या अचानक जाण्याने सर्व मुळशी तालुक्यावर शोककळा पसरली आहे.

### ▶▶| महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी देवेंद्र फडणवीस...

देवेंद्र फडणवीसच मुख्यमंत्री म्हणून शपथ घेणार यावर शिक्कामोर्तब झाल्यानंतर राजकीय वर्तुळातून अनेक प्रतिक्रिया आल्या. केंद्रापासून ते पदाधिकाऱ्यांपर्यंत भाजपातील हजारो लोकांनी देवेंद्र फडणवीस यांचे अभिनंदन केले. तसेच शुभेच्छांचा वर्षाव केला. यातच सुधीर मुनगंटीवार यांनी देवेंद्र फडणवीस यांच्याबद्दल कौतुकोद्गार काढले.

विधिमंडळ पक्षाच्या बैठकीत देवेंद्र फडणवीस यांच्या नावाचा प्रस्ताव दिला. त्या प्रस्तावाला अनेकांनी अनुमोद दिले. एकमताने सर्वांनी देवेंद्र फडणवीस यांची भाजपाच्या गटनेतेपदी नियुक्ती केली. एकाही व्यक्तीने वेगळे मत व्यक्त केले नाही. महाराष्ट्राच्या प्रगतीसाठी देवेंद्र फडणवीस एक शिवभक्त म्हणून काम करतील. महायुतीच्या सरकारमध्ये कोण-कोण शपथ घेणार, हा अधिकार देवेंद्र फडणवीस यांचा आहे, असे सुधीर मुनगंटीवार यांनी सांगितले. दरम्यान, देवेंद्र फडणवीस यांच्या पुन्हा येईल या वाक्याची विरोधकांनी खिल्ली उडवली. मात्र, ते पुन्हा आले. खरे तर अहंकार हा असाच जात असतो. शेवटी विरोधकांना अहंकाराचे फळ मिळाले. सच परेशान हो सकता है लेकिन पराजित नहीं, असे सांगत त्यांनी विरोधकांना खोचक टोला लगावला.

Printed, published and owned by Rakesh Shankar Gore and printed at Somani Printing Press, unit no.04, ground floor, n.k. industrial estate, off. aarey road, near pravasi ind. estate, gate no.2, goregaon (east) Mumbai-400063, and published at shop no. 12, b-2, sai dham shopping center, mangal nagar, 15 no. last bus stop, near g.c.c. club, mira road (east), Dist. Thane-401107, Maharashtra. Editor: Rakesh Shankar Gore. RNI REG. NO.: MAHBIL/2023/86118. Office contact no. 9702386118, Website: www.lokrakshanay.com, Email: dainiklokrakshanay@gmail.com (ठाणे न्याय कक्षेत)

# मतदान यंत्रे हॅक केली नाही तर, त्यात छेडछाड केलीय

## आमदार जितेंद्र आव्हाड यांचा गंभीर आरोप



**ठाणे (सम्यक कासारे) :** मतदान यंत्र (इव्हीएम) हॅक केले असा आमचा आरोप नाही. पण, मतदान यंत्रामध्ये छेडछाड करण्यात आली आहे, असे आमचे मत आहे आणि त्यावर आम्ही ठाम आहोत. १७ सी चा अर्ज आणि झालेले मतदान यांची आकडेवारी जर जुळत नसेल तर नक्कीच काही तरी घोटाळा आहे, असा आरोप राष्ट्रवादी (शरद पवार गट) विधिमंडळातील गटनेते जितेंद्र आव्हाड यांनी बुधवारी ठाण्यात पत्रकारांशी बोलताना केला.

हा सगळा कुणाच्या तरी आदेशावरून झालेला घोळ आहे, असा आरोपही त्यांनी केला आहे. विधानसभा निवडणुकीच्या निकालानंतर विरोधी पक्षाकडून मतदान यंत्राविषयी संशय व्यक्त केला जात असून या पार्श्वभूमीवर राष्ट्रवादी (शरद पवार गट) विधिमंडळातील गटनेते जितेंद्र आव्हाड यांनी ठाण्यात अनोखे आंदोलन केले. ईव्हीएम हटाओ... लोकशाही बचाओ असा नारा देत त्यांनी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांना सामान्य नागरिकांची सुमारे दहा हजार पोस्टकार्ड पाठविली. या आंदोलनानंतर पत्रकारांशी बोलताना त्यांनी गंभीर आरोप केले. मतदान यंत्र हॅक केले असा आमचा आरोप नाही. मात्र, मतदान यंत्रामध्ये छेडछाड करण्यात आली, असे आमचे मत आहे आणि त्यावर आम्ही ठाम आहोत, असे आव्हाड म्हणाले. १७ सी चा अर्ज आणि झालेले मतदान यांची आकडेवारी जर जुळत नसेल तर नक्कीच काही तरी घोटाळा आहे, असा आरोप त्यांनी केला. पाच वाजता ५२ टक्के मतदान होते. नंतर ते ६५ ते ६८ टक्के झाले. ही आकडेवारी कशी वाढली? एकदम १३ टक्के वाढ म्हणजे झालेल्या मतदानाच्या एक चतुर्थांश मतदान अवघ्या तासाभरात होऊ शकते का? ही वाढ कुठून झाली? यावर निवडणूक आयोग काहीही बोलायला तयार नाही, असेही ते म्हणाले.

# शासनाकडून मानधन घेणाऱ्या वृध्द साहित्यिक, कलावंतांनी आधारकार्ड अपडेट करावे

**ठाणे (यश सावंत) -** महाराष्ट्र शासनाच्या सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रीडा, पर्यटन विशेष सहाय्यक विभागातर्फे राजर्षी शाहू महाराज वृध्द साहित्यिक, कलावंत मानधन योजना राबविली जाते. १९५४-५५ या वर्षापासून संपूर्ण राज्यात राबविण्यात येणाऱ्या या योजनेचा लाभ आता प्रत्यक्ष लाभ हस्तांतरण (डीबीटी) पद्धतीने देण्यात येणार आहे. यासाठी जिल्हा परिषद, ठाणे समाज कल्याण विभागाच्या वतीने लाभार्थ्यांचे आधार कार्ड संकलनाचे काम चालू आहे. लाभार्थी कलाकारांनी आधार व्हेरीफिकेशन करण्याचे जाहिर आवाहन जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे यांनी केले आहे. आधार व्हेरीफिकेशन करण्यापूर्वी वृध्द कलावंत यांनी आधार क्रमांक सोबत मोबाईल क्रमांक व बँक खाते लिंक असणे आवश्यक आहे. ज्यांचे आधार कार्ड लिंक नसेल त्यांनी आधार केंद्रावर जाऊन आधार कार्ड अपडेट करावे. ज्या वृध्द कलावंत व साहित्यीकांचे आधार कार्ड हे मोबाईल क्रमांक व बँक खाते लिंक आहेत, त्यांनी आधार व्हेरीफिकेशनसाठी गट विकास अधिकारी पंचायत समिती - शहापूर, अंबरनाथ, भिवंडी, कल्याण, मुरबाड, समाज कल्याण अधिकारी म.न.पा ठाणे, नवीमुंबई, कल्याण- डोंबिवली, उल्हासनगर, भिवंडी, मिरा-भाईदर व प्रशासन अधिकारी कुळगाव-बदलापूर, अंबरनाथ नगरपालिका तसेच जिल्हा परिषद ठाणे जी. एस. टी कार्यालयासमोर वागळे इस्टेट, रोड न. २२, ठाणे (प) या कार्यालयातील ९६१९७८९१६४, ९२२५८५१७८९ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क करावा, असे आवाहन अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी अजिंक्य पवार यांनी केले आहे. तथापी प्राप्त माहितीतील कलावंतांचे मोबाईल क्रमांक आधार कार्डला लिंक नसल्याचे निदर्शनास आले आहे. प्राप्त झालेले आधारकार्डची पडताळणी करण्याकरिता सांस्कृतिक कार्यालयामार्फत http://mahakalasanman.org/AadharVerification.aspx लिंक उपलब्ध करून देण्यात आली आहे. या वेबसाईड मार्फत देखील माहिती तपासणी करता येणार आहे.

## कसारा लोकलमधील प्रवाशावरील हल्ला प्रकरण


# आरोपीचा जामीन कल्याण न्यायालयाने फेटाळला



**कल्याण (आकाश कांबळे)** – कसारा लोकलने प्रवास करत असताना चार जणांनी टिटवाळा ते वासिंद दरम्यान एका प्रवाशासह त्यांच्या तीन सहकाऱ्यांवर जीवघेणा हल्ला केला होता. एप्रिल महिन्यात ही घटना घडली होती. या हल्ल्यात गंभीर जखमी झालेल्या प्रवाशाचा रुग्णालयात उपचार सुरू असताना मृत्यू झाला होता. या प्रकरणातील दोन जणांना कल्याण लोहमार्ग पोलिसांनी पकडले होते. त्यानंतर त्यांना जामीन होऊन बाहेर आले होते. खुनाचा गुन्हा नोंद होताच या दोन जणांना पोलिसांनी पुन्हा पकडले होते. या प्रकरणातील एका मारेकऱ्याचा जामीन कल्याण जिल्हा व सत्र न्यायालयाचे अतिरिक्त सत्र न्यायाधिश आर. जी. वाघमारे यांनी फेटाळून लावला. लोकलमध्ये प्रवाशाला मारहाण सुरू असताना एका जागरूक प्रवाशाने त्या मारहाणीची मोबाईलच्या माध्यमातून एक दृश्यचित्रफित तयार केली होती. ती चित्रफित समाज माध्यमांवर सामायिक केली होती. या समाज माध्यमांवरील चित्रफितीचा आधार घेऊन मारहाणीत गंभीर जखमी होऊन नंतर रुग्णालयात उपचार घेत असताना मृत झालेले दत्तात्रय भोईर यांच्या नातेवाईकांनी याप्रकरणी मारेकऱ्यांना कठोर शिक्षा करण्याची मागणी न्यायालयाकडे केली होती. समाज माध्यमातील ही चित्रफित पोलिसांनी पाहिली. न्यायालयात मृताचे नातेवाईकाचे वकीलपत्र घेणाऱ्या ॲड. सागर कदम यांनी न्यायालयात दाखल केली. या चित्रफितीमुळे या घटनेला सबळ पुरावा मिळाला, असे मयताचे तक्रारदार नातेवाईक यांचे वकील ॲड. सागर कदम यांनी सांगितले.गंभीर जखमी झालेल्या दत्तात्रय भोईर या प्रवाशाचा नंतर मृत्यू झाल्याने याप्रकरणातील मारेकरी तनुज जम्मुवाल यांच्यासह तीन जणांवर खुनाचे कलम प्राथमिक तपासणी अहवालात नंतर लावण्यात आले. जामिनावर बाहेर आलेल्या दोन संशयितांमधील मारेकरी तनुज व साथीदारावर खुनाचे कलम दाखल होताच पोलिसांनी त्यांना अटक केली होती.

# दिवा रेल्वे स्थानकात रेल्वे मार्गात उभे राहून जलद लोकलमध्ये चढण्यासाठी प्रवाशांची चढाओढ

**दिवा (रोहित जैसवाल) :** दिवा रेल्वे स्थानकात सीएसएमटीकडे जाणाऱ्या काही जलद लोकल्सना सकाळच्या वेळेत थांबा आहे. या लोकल कल्याण, डोंबिवली रेल्वे स्थानकातून प्रवाशांनी तुडुंब भरून येतात. दिवा रेल्वे स्थानकातील प्रवाशांना या जलद लोकलमध्ये चढता येत नाही. दिवा रेल्वे स्थानकातील अनेक प्रवासी रेल्वे मार्गात उभे राहून फलाटाच्या विरुध्द दिशेने जलद लोकलमध्ये चढण्याचा प्रयत्न करतात. या जीवघेण्या प्रवासाबद्दल इतर प्रवासी तीव्र नाराजी व्यक्त करत आहेत.



दिवा रेल्वे स्थानकात सकाळच्या वेळेत मुंबईला जाणाऱ्या सर्व लोकल्स प्रवाशांनी खच्चून भरून जातात. प्रत्येक प्रवाशाची वेळेत कार्यालयात, कामाच्या ठिकाणी पोहचण्याची घाई असते. त्यामुळे बहुतांशी प्रवासी जलद लोकने मुंबईत पोहचण्यासाठी दिवा रेल्वे स्थानकात टिटवाळा, कल्याण, कसारा, कर्जत, बदलापूर भागातून येणाऱ्या जलद लोकलमध्ये चढण्याचा प्रयत्न करतात. या लोकल कल्याण, डोंबिवली, टिटवाळा, बदलापूर, उल्हासनगर रेल्वे स्थानकात प्रवाशांनी खच्चून भरल्या जातात. या लोकल्सच्या दरवाजामध्ये प्रवाशांची अभेद्य भिंत असते. ती तोडून दिवा रेल्वे स्थानकातील फलाटावरील प्रवाशांना लोकलमध्ये चढता येत नाही.

या लोकलना दिवा रेल्वे स्थानकात थांबा असला तरी प्रवाशांना या खच्चून भरलेल्या लोकलमध्ये चढता येत नाही. असे बहुतांशी पुरूष प्रवासी लोकल येण्यापूर्वी रेल्वे मार्गात उतरतात. लोकलच्या फलाटाच्या विरुध्द बाजूकडील दरवाजातून रेल्वे मार्गात उभे राहून चढण्याचा प्रयत्न करतात. विरुध्द बाजूकडील दरवाजातही हे प्रवासी लोंबकळत प्रवास करत असतात. अगोदरच दरवाजात उभे असलेल्या प्रवाशांना दिवा रेल्वे स्थानकातील प्रवाशांच्या त्रासाला सामोरे जावे लागते. या डब्यात चढून दिले नाहीतर तर ते दादागिरी करतात, अशा तक्रारी प्रवाशांनी केल्या.

सकाळच्या वेळेत दिवा रेल्वे स्थानकात रेल्वे सुरक्षा बळाचे जवान तैनात असतात. पण काही वेळ ते फलाटावरून बाजुला गेले की फलाटावरील प्रवासी रेल्वे मार्गात उतरून विरुध्द बाजुने लोकल डब्यात चढतात, अशा तक्रारी प्रवाशांनी केल्या. विरुध्द बाजुने चढणाऱ्या प्रवाशाला थेट डब्यात प्रवेश मिळत नाही. तो प्रवासी दरवाजात लोंबकळत प्रवास करतो. दिवा रेल्वे स्थानक लोकलने सोडल्यावर मुंब्रा दिशेने जाताना लोकलने वेग घेतला की लोकल अति वेगाने हेलकावे घेते. या भागात रेल्वे रुळालगत वीज वाहक तारांचे खांब आहेत. अनेक वेळा प्रवाशावर डब्यातील प्रवाशांचा दरवाजातील प्रवाशावर भार येऊन लोंबकळत असलेला प्रवासी रेल्वे मार्गात पडतो किंवा काही वेळा खांबाचा फटका बसून तो रेल्वे मार्गात पडतो, अशी माहिती रेल्वे प्रवाशांनी दिली.

दिवा रेल्वे स्थानकातील प्रवाशांचा हा धोकादायक प्रवास टाळण्यासाठी रेल्वे सुरक्षा जवानांनी सकाळच्या वेळेत फलाट परिसरातील गस्त कायम ठेवण्याची मागणी प्रवासी करत आहेत.

# आवक घटल्याने टोमॅटो, मटारच्या दरात वाढ

**नवी मुंबई (धनश्री सट्टा) -** मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीत टोमॅटो आणि मटारची आवक कमी होत असून दर वधारले आहेत. मागील एक महिन्यापासून टोमॅटो दर आवाक्यात होते परंतु टोमॅटोच्या दराने पुन्हा उसळी घेतली असून प्रतिकिलो चाळीशी गाठली आहे. हिरव्या वाटाण्याच्या दरातही वाढ झाली आहे.



बदलत्या वातावरणाने टोमॅटोच्या दर्जावर परिणाम होत आहे. त्याचबरोबर परतीच्या पावसाने टोमॅटो पिकाचे नुकसान झाल्याने बाजारात सध्या आवक कमी होत असून त्यामुळे दरात वाढ झाली आहे. बाजारात २८ गाड्यांद्वारे १४६८ क्विंटल टोमॅटो आवक झाली आहे. दरात प्रतिकिलो १०-१२ रुपयांची वाढ झाली आहे. मंगळवारी घाऊक बाजारात प्रतिकिलो ४० रुपयांनी विक्री झाली आहे. मागील काही दिवसांपासून मटार म्हणजेच मटारचे दर आवाक्यात आले होते, परंतु मंगळवारी पुन्हा घाऊक बाजारात वाटाण्याची आवक घटल्याने दरात प्रतिकिलो १५-२० रुपयांनी वाढ झाली आहे. घाऊक बाजारात आधी प्रतिकिलो ६५-७० रुपयांनी उपलब्ध असलेला वाटाणा आता ८०-९० रुपयांनी विक्री होत आहे. मटारचीही आवक कमी आहे. मंगळवारी २० गाड्यांमधून ९३५ क्विंटल वाटाणा दाखल झाला आहे. राज्यातील सातारा ,नाशिक येथील वाटाणा दाखल होत आहे तर परराज्यातील आवक कमी झाली आहे. पावसामुळे उत्पादन कमी त्यात वातावरण बदलाचा फटका बसत असल्याने आवक कमी होत आहे. तसेच हिरव्या वाटाण्याला ज्याठिकाणी अधिक बाजारभाव आहे त्याठिकाणी त्याचा पुरवठा वाढला आहे.

### यंदा मटारचे उत्पादन कमीच

एपीएमसीत डिसेंबर महिन्यात मोठ्या प्रमाणात हिरवा वाटाणा दाखल होण्यास सुरुवात होत असते, शिवाय डिसेंबरमध्ये वाटण्याचा खरा हंगाम सुरू होतो तर वर्षभर तुरळक वाटाणा दाखल होत असतो. बाजार समितीत राज्यातील आणि मध्य प्रदेशातून मटारची आवक होते. मात्र सध्या परतीच्या पावसामुळे वाटणाच्या उत्पादनाला फटका बसला आहे. त्यामुळे बाजारात आवक कमीच आहे. पावसामुळे उत्पादन कमी त्यात वातावरण बदलाचा फटका टोमॅटो आणि मटार पिकांना बसला आहे. परिणामी आवक घटून दर वाढले आहेत.

# पाच वर्षापर्यंतच्या सर्व बालकांसाठी रविवार, ०८ डिसेंबर रोजी उपराष्ट्रीय पल्स पोलिओ मोहीम

**ठाणे (विशाल पाटील) -** ठाणे जिल्हा परिषद क्षेत्रात, शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार, सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत रविवार ०८ डिसेंबर, २०२४ रोजी ग्रामीण भागातील अंबरनाथ, कल्याण, भिवंडी, मुरबाड तालुक्यात तसेच बदलापूर व अंबरनाथ नगरपालिका क्षेत्रात उपराष्ट्रीय पल्स पोलिओ मोहिम राबविण्यात येणार आहे.




सर्व बालकांना विहित वयात प्राथमिक लसीकरण, नियमित एएफपी सर्व्हेक्षण आणि पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेतंर्गत ० ते ५ वर्षाखालील सर्व बालके संरक्षित करणे हा या मोहिमेचा उद्देश आहे. राज्यात सन १९९५ पासून दरवर्षी पल्स पोलिओ मोहिम राबविण्यात येते. ठाणे जिल्हा परिषदच्या सार्वजनिक आरोग्य विभागातंर्गत कार्यरत सर्व आरोग्य केंद्रामध्ये ही लस मोफत उपलब्ध करण्यात आली आहे. त्याचा लाभ पालकांनी ० ते ५ वर्षापर्यंतच्या सर्व बालकांना द्यावा, असे आवाहन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी रोहन घुगे, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. गंगाधर परगे यांनी केले आहे. ग्रामीण भागातील ० ते ५ वर्षाखालील १ लाख ८ हजार ७२४ बालकांना तर बदलापूर व अंबरनाथ नगरपालिका क्षेत्रातील ६८ हजार ८३३ बालकांना असे एकूण १ लाख ७७ हजार ५५७ बालकांना पल्स पोलिओ लस देण्याचे नियोजन आरोग्य विभागाकडून करण्यात आले आहे. ठाणे जिल्हा परिषद क्षेत्रात, एकूण १ हजार ४०३ बूथवर ही लसीकरण मोहीम राबविण्यात येणार आहे. त्यासाठी ठाणे जिल्हा परिषद ३ हजार ४४० कर्मचारी कार्यरत असतील.

## राहत्या घरांचे भवितव्य काय?

# उरण, पनवेल आणि पेणमधील शेतकऱ्यांचा सरकारला सवाल

**नवी मुंबई (भावना जैन) :** शेतकऱ्यांना विश्वासात न घेता सरकारने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण( एमएमआरडीए) कडून उरण,पनवेल आणि पेण मधील शेतकऱ्यांच्या जमिनी संपादित करण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे सिडकोच्या नैनाप्रमाणे शेतकऱ्यांच्या राहत्या घरांचे काय होणार असा सवाल केला जात आहे. तर राज्यातील नवे सरकार येथील शेतकऱ्यांनी केलेल्या सूचना आणि हरकतीची नोंद घेणार का, असा सवाल शेतकऱ्यांकडून व्यक्त केला जात आहे. तिसरी मुंबई विकसित करण्यासाठी एमएमआरडीएची नव नगर विकास प्राधिकरण (एनटीडीए) म्हणून नियुक्ती केल्याची अधिसूचना जाहीर केला आहे. यासाठी उरण तालुक्यातील २९,पनवेल मधील – ७ तर पेण मधील ८८ आशा एकूण १२४ गावातील ३३२ चौरस किलोमीटर क्षेत्रावर हे नवे शहर उभारण्यात येणार आहे. या शहराला मुंबईतील बीकेसीच्या धर्तीवर कर्नाळा- साई – चिरनेर(के एस सी) संकुल या नावाने ओळखले जाणार आहे. यासाठी येथील शेतकऱ्यांच्या जमीनी संपादीत करण्यात येणार आहेत. शेतकऱ्यांना विश्वासात न घेता शासनाने निर्णय घेतल्याने विरोध करण्यास सुरुवात केली आहे. मार्च महिन्यात कोकण भवन येथील कोकण नगररचना विभागाकडे शेतकऱ्यांनी २५ हजार हरकती व सूचना नोंदविल्या होत्या. मात्र या संदर्भात शासनाने कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता विधानसभा निवडणुकीची आचारसंहिता लागण्याच्या आदल्या दिवशी एमएमआरडीएची नव नगर प्राधिकरण म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये असंतोष आहे. शहर आणि उद्योग निर्मितीसाठी सरकारकडून शेतकऱ्यांच्या जमीनी हिसकावून घेतल्या जात असल्याने एमएमआरडीएच्या अधिसूचनेला शेतकऱ्यांनी हरकती नोंदविल्या होत्या. याकडे दुर्लक्ष करण्यात आले आहे.




पचावन्न वर्षांपूर्वी सरकारने सिडकोच्या माध्यमातून नवी मुंबईसाठी उरणच्या पश्चिम भागातील जमीनी संपादित केल्या आहेत. त्यानंतर तालुक्यात ओएनजीसी, जेएनपीटी बंदर,वायू विद्युत केंद्र, भारत पेट्रोलियम प्रकल्प, बंदरावर आधारित सेझ, उद्योग,नव्याने येणारा अलिबाग विरार कॉरिडॉर, एमआयडीसीचा उद्योग, सिडकोचा रिजनल पार्क,लॉजिस्टिक पार्क,नवी मुंबई सेझ प्रकल्प या प्रकल्पासाठी भूसंपादन झाले आहे. तर आता एमएमआरडीए उरण, पनवेल आणि पेण तालुक्यातील १२४ गावांतील शेत जमीनी आणि इतर जमीनीचा यात समावेश आहे. गेली अनेक वर्षे नैना या सिडकोच्या विभागाची अधिसूचना जारी करण्यात आली होती. ती रद्द करून शासनाने एमएमआरडीए मार्फत अधिसूचना काढून येथील जमीनी संपादित करण्यात येणार असल्याचे जाहीर केले आहे. शेतकऱ्यांच्या मालकीच्या असलेल्या या जमीनीवर शेतकऱ्यांनी आपल्या भावी पिढीसाठी घरांचे बांधकाम केले आहे. या घरांचे मूळ गावांचे काय होणार,भूसंपादन करतांना शासनाने २०१३ चा शेतकरी हिताचा भूसंपादन आणि पुनर्वसन कायदा का डावलला आहे तसेच लोकप्रतिनिधी याची दखल घेऊन शेतकऱ्यांना न्याय देतील का असा सवाल कोप्रोली येथील शेतकरी रुपेश पाटील यांनी उपस्थित केला आहे.

# अभिनेता नवीन कस्तुरिया अडकला लग्नबंधनात



मनोरंजनविश्वात सध्या लगीनघाई सुरू आहे. एकापाठोपाठ एक अनेक कलाकार त्यांच्या लग्नाच्या बातम्या देत आहेत. अशातच आणखी एका लोकप्रिय अभिनेत्याने लग्नगाठ बांधली आहे. 'Aspirants' या गाजलेल्या सीरिजमध्ये आपल्या भूमिकेने प्रेक्षकांची मनं जिंकणारा अभिनेता नवीन कस्तुरिया लग्नबंधनात अडकला आहे.

३९ वर्षीय नवीन कस्तुरियाने त्याच्या लग्नाचे फोटो इन्स्टाग्रामवर शेअर करून आनंदाची बातमी चाहत्यांना दिली. नवीनने शेअर केलेल्या पहिल्या फोटोमध्ये तो आपल्या पत्नीच्या भांगेत कुंकू भरताना दिसत आहे. दुसऱ्या फोटोत तो पत्नीचा हात धरून सात फेरे घेताना दिसत आहे. अभिनेत्याने लग्नात पांढऱ्या रंगाची शेरवानी परिधान केली होती. तर त्याच्या वधूने सोनेरी रंगाचा लेहेंगा परिधान केला होता.

नवीन कस्तुरियाच्या पत्नीचे नाव शुभांगी शर्मा आहे. नवीनच्या लग्नाला अभिनेत्री हर्षिता गौरने हजेरी लावली होती. तिनेही इन्स्टाग्रामवर एक स्टोरी पोस्ट करून नवीन व शुभांगीला नवीन प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या आहेत. नवीनने शेअर केलेल्या पोस्टवर चाहते कमेंट्स करून त्याचं व शुभांगीचं अभिनंदन करत आहेत.

# 'पुष्पा २'चा प्रदर्शनाच्या एक दिवस आधीच विक्रमी रेकॉर्ड

अल्लू अर्जुन आणि रश्मिका मंदानाचा बहुप्रतिक्षित चित्रपट 'पुष्पा २' सिनेमागृहात प्रदर्शित होण्यासाठी आता फक्त काही तास शिल्लक आहेत. प्रदर्शित होताच हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर मोठा गल्ला जमवणार असं चित्र दिसत आहे. कारण ॲडव्हान्स बुकिंगमध्ये या चित्रपटाने तब्बल १०० कोटी रुपयांचा आकडा गाठला आहे. राम चरण आणि ज्युनिअर एनटीआरच्या




आहे. याआधी 'कल्की २८९८ एडी' या चित्रपटानेही ॲडव्हान्स बुकिंगमध्ये अशीच कमाई केली होती. 'पुष्पा २' चित्रपटाचे संपूर्ण भारतात २८ हजारांहून अधिक शो होणार आहेत. त्यासाठी तब्बल २० लाखांहून जास्त तिकिटे विकली गेली आहेत. हा चित्रपट २डी, ४डीएक्स आणि आय

'आरआरआर' चित्रपटासह 'बाहुबली २'चा विक्रमी रेकॉर्ड 'पुष्पा २' चित्रपटाने मोडला आहे आणि ॲडव्हान्स बुकिंगमध्ये तब्बल १०० कोटी रुपयांपर्यंत झेप घेतली आहे. सॅकलिंकवर दिलेल्या माहितीनुसार, या चित्रपटाने परदेशात ॲडव्हान्स बुकिंगमध्ये ३० कोटी रुपयांची कमाई केली आहे, तर देशभरात या चित्रपटाने प्रदर्शनाआधीच ७० कोटींची कमाई केली आहे. म्हणजेच एकूण या चित्रपटाने ॲडव्हान्स बुकिंगमध्ये चित्रपट प्रदर्शित होण्याच्या एक दिवस आधीच १०० कोटी रुपयांचा गल्ला जमवला आहे. अशा पद्धतीने दमदार कमाई करणारा हा दुसरा भारतीय चित्रपट

मॅक्समध्ये उपलब्ध असून तामिळ, तेलुगू, कन्नड आणि मल्याळम भाषांमध्ये प्रेक्षकांना पाहता येणार आहे. ॲडव्हान्स बुकिंगमध्ये 'बाहुबली २' ने ९० कोटींची कमाई केली होती, तर 'केजीएफ चॅप्टर २'ने ८० कोटी रुपयांची कमाई केली होती. 'पुष्पा २' चित्रपट प्रदर्शित होण्याआधीचे आकडे पाहता हा चित्रपट बॉक्स ऑफिसवर तुफान कमाई करणार आणि विक्रमी रेकॉर्ड बनवणार असं म्हटलं जात आहे. या चित्रपटाची ओपनिंग बॉक्स ऑफिसवर २०० ते ३०० कोटींपर्यंत पोहचू शकते, अशा शक्यता नेटकऱ्यांकडून व्यक्त केल्या जात आहेत.

# 'हायवे' चित्रपटातील वीरा त्रिपाठीच्या भूमिकेसाठी आलिया भट्ट नव्हे, तर 'ही' अभिनेत्री होती पहिली पसंती



सिनेविश्वात एखादा चित्रपट बनवताना त्यामागे बरीच मेहनत घेतली जाते. दिग्दर्शक आणि निर्मात्यांना चित्रपटातील एखादे पात्र उत्तमरीत्या साकारलं जावं यासाठी त्यांना हवा तसा कलाकार शोधताना तारेवरची कसरत करावी लागते. त्यासाठी बऱ्याच ऑडिशन घेतल्या जातात आणि त्यामध्ये कलाकारांना त्यांच्या कामाचं कसब दाखवावं लागतं. बॉलीवूडमधील अभिनेत्री आलिया भट्टचा 'हायवे' चित्रपट सर्वांनीच पाहिला असेल. या चित्रपटात आलियाने दमदार अभिनय केला आहे. या चित्रपटातील तिच्या अभिनयाचं सर्वत्र कौतुक झालं. मात्र, तुम्हाला माहितीये का? इम्तियाज अली यांची या चित्रपटासाठी पहिली पसंती आलिया नाही, तर ऐश्वर्य बच्चनला होती. 'हायवे'साठी मुख्य भूमिकेत आलिया नाही, तर अभिनेत्री ऐश्वर्या राय-बच्चनला दिग्दर्शकांनी पहिली पसंती दिली होती. पण मग, आलियाची निवड कशी झाली याची माहिती जाणून घेऊ. 'मिड-डे'ने दिलेल्या माहितीनुसार, इम्तियाज अली यांनी एका मुलाखतीमध्ये याचा खुलासा केला होता. चित्रपटातील वीरा त्रिपाठी हे पात्र साकारण्यासाठी त्यांना एक मध्यमवयीन अभिनेत्री हवी होती.

# शाहरुख खानच्या सिनेमातून मराठमोळ्या अभिनेत्रीचा केला होता पत्ता कट; स्वत:चे दु:ख व्यक्त करत म्हणाली...

मराठमोळी अभिनेत्री ईशा कोप्पीकरने २००६ मध्ये शाहरुख खानच्या 'डॉन' या चित्रपटात काम केले होते. मात्र, त्या चित्रपटाच्या सिक्वलमध्ये म्हणजेच २०११ मधील 'डॉन २'मध्ये तिला भूमिका मिळाली नाही. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिने याबद्दल आपले मत व्यक्त केले होते. 'गलटा इंडिया'ला दिलेल्या मुलाखतीत ईशा कोप्पीकरने 'डॉन' चित्रपटात काम करण्याचा अनुभव शेअर केला. ती म्हणाली, "'डॉन' चित्रपटात मला भूमिका करण्याची संधी मिळाली तेव्हा मला खूप आनंद झाला होता, मात्र मला असे वाटले की प्रियांका चोप्राची भूमिका माझ्या भूमिकेपेक्षा अधिक प्रभावशाली होती. तिची भूमिका अधिक सशक्त होती आणि ती खूप चांगल्या प्रकारे विकसित करण्यात आली होती. त्या भूमिकेसाठी मी काहीही केलं असतं.

मी २५ वर्षांपासून तायक्वांदो शिकत आहे आणि ब्लॅक बेल्ट आहे. ॲक्शन सीन्समध्ये मी कुठल्याही




अभिनेत्रीला टक्कर देऊ शकते." 'डॉन २'मध्ये भूमिका मिळाली नसल्याची खंत'२०११ साली प्रदर्शित झालेल्या 'डॉन २' या सिक्वलमध्ये ईशाला भूमिका देण्यात आली नाही, याचा तिला खूप राग आला आणि दुःखही झाले. ती म्हणाली, "मला 'डॉन २' सिनेमात भूमिका मिळावी यासाठी मी निर्मात्यांशी स्वतःहून संपर्क साधला होता, पण मी संपर्क साधण्याआधीच त्या भूमिकेचे कास्टिंग झाले आहे असं मला सांगण्यात आलं. हे ऐकून सुरुवातीला मला खूप वाईट वाटले, पण नंतर मी त्याकडे दुर्लक्ष केलं." फरहान अख्तरने २००६ मध्ये अमिताभ बच्चन यांचा प्रसिद्ध चित्रपट 'डॉन'चा रिमेक केला होता. या चित्रपटात शाहरुख खान, प्रियांका चोप्रा, अर्जुन रामपाल आणि ईशा कोप्पीकर यांच्या महत्त्वाच्या भूमिका होत्या. २०११ मध्ये 'डॉन २' हा सिक्वल प्रदर्शित झाला. शाहरुख खान, प्रियांका चोप्रा, बोमन इराणी, लारा दत्ता, ओम पुरी आणि कुणाल कपूर हे कलाकार त्यात झळकले होते.

# स्वप्नील जोशीने खरेदी केली आलिशान गाडी, Defender कारचा पहिला फोटो आला समोर

मराठी कलाविश्वाचा 'मितवा' म्हणून अभिनेता स्वप्नील जोशीला ओळखलं जातं. त्याचा चाहतावर्ग मोठ्या प्रमाणात आहे. 'क्लासमेट', 'दुनियादारी', 'प्यारवाली लव्हस्टोरी', 'तू ही रे' अशा एकापेक्षा एक जबरदस्त चित्रपटांमध्ये त्याने काम केलेलं आहे.




स्वप्नीलच्या व्यावसायिक आयुष्याची सोशल मीडियावर नेहमीच चर्चा असते. पण, अभिनेत्याने नुकतीच त्याच्या वैयक्तिक आयुष्यातली आनंदाची बातमी आपल्या चाहत्यांबरोबर शेअर केली आहे.


वर्षाखेरीस स्वप्नील जोशीच्या घरी एका नव्या पाहुणीचं आगमन झालेलं आहे. ही पाहुणी म्हणजे त्याची डिफेंडर कार. ही नवीन गाडी खरेदी केल्यावर स्वप्नीलची खऱ्या अर्थाने स्वप्नपूर्ती झाली आहे. कारण, या आलिशान गाडीची किंमत कोटींच्या घरात आहे. स्वप्नील जोशीने मंगळवारी सायंकाळी ( ३ डिसेंबर ) नवीन कारची पहिली झलक आपल्या चाहत्यांबरोबर शेअर केली आहे. "तर, आज ही खास गोष्ट घडली. डिफेंडर...माझी नवीन गाडी, स्वप्नपूर्ती" असं कॅप्शन अभिनेत्याने या फोटोला दिला आहे.

स्वप्नीलचं नवीन गाडी खरेदी करण्यासाठी गेलेल्या शोरुममध्ये हटके स्वागत करण्यात आलं. याचे फोटो देखील अभिनेत्याने इन्स्टाग्राम स्टोरीवर शेअर केले आहेत.स्वप्नील गाडी खरेदी करण्यासाठी गेला असताना त्याच्या आजूबाजूला गाजलेल्या चित्रपटांमधले त्याचे संवाद पोस्टरसह लावण्यात आले होते. त्यामुळे ही सजावट सर्वांसाठीच लक्षवेधी ठरली आहे. नवीन गाडी खरेदी केल्यावर संपूर्ण कलाविश्वातून स्वप्नील जोशीवर शुभेच्छांचा वर्षाव करण्यात येत आहे. दरम्यान, स्वप्नीलच्या कामाबद्दल सांगायचं झालं, तर नुकताच तो 'नवरा माझा नवसाचा २' या सुपरहिट चित्रपटात झळकला होता. या चित्रपटाने बॉक्स ऑफिसवर चांगली कमाई केल्याचं पाहायला मिळालं. आता लवकरच स्वप्नील 'जिलबी' चित्रपटात झळकणार आहे.

# मराठमोळ्या छाया कदम यांच्या चित्रपटाचा पुन्हा एकदा जागतिक पातळीवर सन्मान

दिग्दर्शक पायल कपाडियाच्या 'ऑल वी इमॅजिन ॲज लाईट' या चित्रपटाला न्यूयॉर्क फिल्म क्रिटिक्स सर्कलमध्ये सर्वोत्तम आंतरराष्ट्रीय चित्रपटाचा पुरस्कार मिळाला आहे. ही माहिती अमेरिकेतील पोर्टल 'डेडलाइन'द्वारे शेअर करण्यात आली. या चित्रपटात मराठमोळ्या अभिनेत्री छाया कदम यांची महत्त्वाची भूमिका असून यावर्षी या चित्रपटाला प्रतिष्ठित अशा 'कान्स' फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'ग्रँड प्रिक्स' हा पुरस्कार मिळाला होता. 'कान्स' चित्रपट महोत्सवात या चित्रपटाचे स्क्रीनिंग झाल्यानंतर या महोत्सवात या चित्रपटाची टीम जेव्हा रेड कारपेटवर आली तेव्हा टीमच कौतुक झाले होते.

'ऑल वी इमॅजिन ॲज लाईट' हा कान्स फिल्म फेस्टिव्हलमध्ये 'ग्रँड प्रिक्स'




पुरस्कार जिंकणारा पहिला भारतीय चित्रपट ठरला होता. आता या चित्रपटाला अमेरिकेत दोन मानाचे पुरस्कार मिळाले आहेत.

विशेष म्हणजे, 'ऑल वी इमॅजिन ॲज लाईट'ला याआधी सोमवारी न्यूयॉर्कमध्ये झालेल्या गॉथम फिल्म अवॉर्ड्स २०२४ मध्येही सर्वोत्कृष्ट आंतरराष्ट्रीय चित्रपटाचा (फिचर ट्रॉफी) सन्मान मिळाला होता. या श्रेणीत 'ग्रीन बॉर्डर', 'हार्ड ट्रुथ्स', 'इन्साईड द यलो कुकून शेल' आणि 'व्हेर्मिग्लिओ' हे चित्रपटदेखील नामांकनात होते. हा सोहळा न्यूयॉर्कमधील सिप्रियानी वॉल स्ट्रीट येथे पार पडला.

'ऑल वी इमॅजिन ॲज लाईट' ज्या संस्थेकडून नवा पुरस्कार मिळाला आहे ती न्यूयॉर्क फिल्म क्रिटिक्स सर्कल ही एक प्रतिष्ठित संस्था असून तिचे सदस्य इंडीवायरचे डेव्हिड एलरिक (२०२४ उपाध्यक्ष), न्यूयॉर्क मॅगझिनचे ॲलिसन विलमोर आणि बिल्जे एबिरी, अटलांटिकचे डेव्हिड सिम्स (२०२४ अध्यक्ष) आणि टाइमच्या स्टेफनी झाकरेक आहेत. 'ऑल वी इमॅजिन ॲज लाईट'मध्ये कानू कुसरुती, दिव्या प्रभा आणि छाया कदम यांच्या प्रमुख भूमिका आहेत. हा चित्रपट फ्रान्समधील 'पेटीट काओस' आणि भारतातील 'चॉक अँड चीज' आणि 'अनदर बर्थ' यांची अधिकृत इंडो-फ्रेंच सहनिर्मिती आहे.

# विवेक ओबेरॉयने सांगितली इंडस्ट्रीची वस्तुस्थिती

विवेक ओबेरॉयने २००२ मध्ये प्रदर्शित झालेल्या 'कंपनी' चित्रपटातून मनोरंजन विश्वात पदार्पण केलं. यानंतर आलेल्या 'साथिया' चित्रपटात विवेक प्रेक्षकांना एका रोमॅंटिक हिरोच्या भूमिकेत पाहायला मिळाला. पण, बॉलीवूडच्या झगमगत्या दुनियेत अनेकदा कलाकारांना कठीण प्रसंगाचा सामना करावा लागतो. प्रचंड मेहनत घेऊनही विवेकला अनेक वर्षं फिल्म इंडस्ट्रीपासून दूर राहावं लागलं. यानंतर अभिनेत्याने मनोरंजन विश्वापासून पूर्णपणे ब्रेक घेत आपलं नशीब एका नव्या क्षेत्रात आजमावलं. उत्तम अभिनयाबरोबच आजच्या घडीला विवेक ओबेरॉय आघाडीचा व्यावसायिक म्हणून ओळखला जातो. विवेकने नुकतीच 'इंडियनएक्स्प्रेस'च्या 'स्क्रीन'ला मुलाखत दिली, यावेळी त्याने त्याच्या 'चॉकलेट बॉय' इरापासून, पुढे बॉलीवूडमधला संघर्ष ते यशस्वी व्यावसायिक असा सगळा प्रवास उलगडून सांगितला आहे. विवेक म्हणाला, "मी माझ्या करिअरच्या गेल्या २२ वर्षांमध्ये जवळपास ६७ प्रोजेक्ट्समध्ये काम केलंय. पण, या इंडस्ट्रीबाबत तुम्ही कोणत्याही प्रकारची शाश्वती देऊ शकत नाही. तुम्ही उत्तम काम करता, पुरस्कार जिंकता, आपलं काम व्यवस्थित मन लावून करता, एक अभिनेता म्हणून तुम्ही सगळ्या गोष्टी करता पण, इतकं सगळं करूनही तुम्हाला काही क्षुल्लक आणि वेगळ्याच कारणांनी काम दिलं जात नाही. २००७ मध्ये मी 'शूटआउट ॲट लोखंडवाला' या सिनेमात काम केलं होतं आणि त्यातलं



'गणपत...' हे गाणं प्रचंड व्हायरल झालं. मला पुरस्कार देखील मिळाले. मला वाटलं त्यानंतर मला बरंच काम मिळेल. पण, माझा अपेक्षाभंग झाला मला कोणतंही काम मिळालं नाही. चित्रपटाला एवढं यश मिळूनही मी १४ ते १५ महिने फक्त घरी बसून होतो. २००९ मध्ये मी मनाशी ठामपणे ठरवलं, आपल्याला पूर्णपणे या इंडस्ट्रीवर अवलंबून राहता येणार नाही, आपण पर्यायी मार्गाचा विचार केला पाहिजे. आर्थिक गरजेसाठी मी स्वत:चं काहीतरी करण्याचा विचार केला. जिथे एखादी लॉबी ( गटबाजी ) तुमचं करिअर ठरवेल, अशा भानगडीत मला पडायचं नव्हतं. काहीजण विशिष्ट गोष्टी करण्यासाठी तुम्हाला धमकावतात, कंट्रोल करतात यापासून वेगळं मला स्वत:चं काहीतरी हवं होतं." "सिनेमा माझं पॅशन आहे पण, बिझनेस करणं हा माझा नेहमीच प्लॅन 'बी' होता. लहानपणापासूनच मला बिझनेस, आर्थिक गुंतवणूक याची बरीच माहिती होती. त्यामुळे मी बिझनेसचा मार्ग निवडला आणि या गटबाजीपासून दूर गेलो. एखादा माणूस तुम्हाला असा वर-वर दिसताना खूप यशस्वी वाटू शकतो. पण, तो आतून एकाकी असतो. जर आज तुम्ही उत्तम निर्णय घेतले, तर तुमचं उद्याचं आयुष्य सुकर होईल. आपण काहीच न करता देवाला आणि नशीबाला दोष देतो असं करू नये. आता मी माझ्यासाठी जगतोय. मी आधी प्रत्येक गोष्टीचा बराच विचार करायचो पण, आता मी फार दडपण घेत नाही. मेहनत केल्यावर आयुष्य नेहमीच तुम्हाला योग्य दिशा दाखवतं." असं विवेक ओबेरॉयने सांगितलं.




▶▶|मेष – मनातील इच्छा पूर्ण होतील. मधुर वाणीच्या जोरावर नातेसंबंध अधिक दृढ करू शकाल. भावनेच्या आहारी जाऊ नका.

▶▶|वृषभ – धार्मिक स्थळांना भेटी द्याल. क्षुल्लक कारणाने चिडचिड होण्याची शक्यता असल्याने वाद टाळा. घरातील कामे होतील.

▶▶|मिथुन – नोकरीत सावध राहा. जवळचे लोक मदत करतील. आपली वैचारिक समृद्धी इतरांना प्रभावित करेल. महत्त्वाचे काम होईल.

▶▶| ▶▶|कर्क – प्रतिस्पर्ध्यांचा सामना करू शकाल. आप्तस्वकियांशी भेटीचा योग आहे. घरातील खर्च वाढेल. आपल्या वाणीवर संयम ठेवा.

▶▶|सिंह – आध्यात्मातून आनंद मिळेल. जमीन, घराशी निगडित कागदपत्रांबाबत सावध राहा. कौटुंबिक वातावरण आनंदी असेल.

▶▶|कन्या – सामाजिक क्षेत्रात प्रतिष्ठा वाढेल. तब्येतीची चिंता दूर होईल. प्रतिस्पर्ध्यांवर विजय मिळवाल. वाटाघाटी यशस्वी होतील.

▶▶|तूळ – व्यवसायात आर्थिक लाभ आणि वृद्धी होईल. मुलांची काळजी लागून राहील. धावपळ वाढेल. अधिक काम कराल. संयम बाळगा.

▶▶|वृश्चिक – मानसिक स्वास्थ्य बिघडू देऊ नका. क्रोध आणि वाणीवर संयम ठेवा. नोकरीच्या ठिकाणी सहकाऱ्यांचे सहकार्य मिळेल.

▶▶|धनु – शारीरिक स्वास्थ्य उत्तम असेल. आर्थिक चणचण जाणवेल. सामाजिक क्षेत्रात यश मिळेल. महत्त्वाची वस्तू सांभाळा.

▶▶|मकर – नवीन ओळखी होतील. क्षुल्लक कारणावरून कुटुंबातील सदस्यांशी वाद संभवतो. नव्या कामांबाबत उत्साह वाढेल.

▶▶|कुंभ – ठरवलेल्या कार्यक्रमात बदल करावा लागेल. अनेक क्षेत्रात यश लाभेल. आपल्या तब्येतीकडे विशेष लक्ष द्या. खर्च वाढेल.

▶▶|मीन – नोकरीत चांगला बदल करता येईल. मित्रांच्या भेटीने आनंद मिळेल. जोडीदाराच्या मताचा आदर करा. खरेदीचा विचार कराल.

# ५० घरफोड्या करणाऱ्या चोरट्यासह टोळी जेरबंद

## टोळीत डॉक्टरचा समावेश



**कोल्हापूर (प्रथमेश चव्हाण):** दक्षिण महाराष्ट्रासह सीमाभागात ५० हून अधिक घरफोड्या करणारा सराईत चोरटा गुरुदत्त शांतीनाथ पोळ (वय ४३, रा. जवाहरनगर, कोल्हापूर) आणि २२ घरफोडीचे गुन्हे करणारा स्वप्निल सुरेश सातपुते (३९, रा. यादवनगर, कोल्हापूर) या दोघांसह चौघांच्या टोळीला स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेच्या पथकाने अटक केली. त्यांच्याकडून इस्पुर्ली आणि मिरजेतील घरफोड्यांची उकल करून पोलिसांनीचोरीतील साडेपाच लाखांचा मुद्देमाल जप्त केला. टोळीतील हरीश मधुकर पोळ (३८, रा. जवाहरनगर) याच्यासह डॉ. संजय मधुकर पोळ (४७, सध्या रा. सुभाषनगर, मिरज, जि. सांगली, मूळ रा. जवाहरनगर, कोल्हापूर) या दोघांनाही पोलिसांनी अटक केली. संजय पोळ हा टोळीचा प्रमुख गुरुदत्त याचा भाऊ आहे. त्याचा मिरजेत दवाखाना आहे. वाढत्या घरफोड्यांचे गुन्हे रोखण्यासाठी रेकॉर्डवरील सराईत गुन्हेगारांचा शोध घेताना स्थानिक गुन्हे अन्वेषण शाखेतील अंमलदार नवनाथ कदम आणि खंडेराव कोळी यांना संशयित गुरुदत्त पोळ याची माहिती मिळाली.

# सावित्री नदीपात्र बनले डंम्पिंग ग्राउंड

## पोलादपूर नगरपंचायतीचा कचरा थेट नदीपात्रात

**पोलादपूर (आकांक्षा नार्वेकर)** - पोलादपूर तालुक्याची उत्तरवाहिनी असणाऱ्या सावित्री नदीपात्रात पोलादपूर शहरातून गोळा केलेला कचरा टाकण्याचे कृत्य हे राजरोसपणे सुरु आहे. या कृत्यामुळे पर्यावरणाची हानी होत असून हरित लवादाकडून यापूर्वी सात लाख रुपयांचा दंड पोलादपूर नगरपंचायतीला ठोठावला होता. मात्र सातत्याने हेच कृत्य सुरु असल्याने पोलादपूर नगरपंचायतीचे विरोधी पक्षनेते दिलीप भागवत यांनी तीव्र आंदोलनाचा ईशारा लेखी पत्राद्वारे दिला आहे.

यंदाच्या पावसाळ्यात पोलादपूर नगरपंचायतीचा कचरा पुराच्या पाण्यात टाकतानाचा व्हिडिओ सोशल मीडियावर चांगलाच चर्चेत राहिला.



यानंतर नगरपंचायत प्रशासन कंत्राटी तत्वावर काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या जीवाशी खेळ करते का? असा प्रश्न देखील नेटकऱ्यांनी उपस्थित केला.

पोलादपूर तालुक्याची उत्तरवाहिनी असणाऱ्या सावित्री नदीपात्राच्या तिरावर पोलादपूर शहर, चरई, काटेतळी या गावांच्या पाण्याची जॅकवेल असल्याने सावित्री नदीतून होणाऱ्या पाणी पुरवठ्यातून या गावांना पाणी जात असते. मात्र सावित्री नदीत थेट टाकल्या जाणाऱ्या कचऱ्यामुळे दूषित पाण्याचा पुरवठा झाल्याने पावसाळ्यात अनेक वेळा साथीच्या आजारांची साथ आल्याचे पाहावयास मिळते. सरकारी नियमानुसार नदीपात्रापासून १०० मीटर अंतरावर व महामार्गपासून २०० मीटर अंतरावर डम्पिंग ग्राउंड करण्याला प्रतिबंद असताना देखील स्मशानभूमीजवळील मोकळ्या जागेत डंम्पिंग ग्राउंड करण्यात आले आहे तर लेप्रसी रुग्णालयाच्या समोरील नदीपात्रात खुले आम कचरा टाकला जात आहे. शहरात मोकाट फिरणारी गुरे ही अनेक वेळा हा प्लॅस्टिक युक्त कचरा खात असल्याने मृत्युमुखी पडल्याच्या घटना घडल्या आहेत. त्यामुळे डम्पिंग ग्राउंडचा प्रश्न मार्गी लावणे क्रमप्राप्त बनले असून मार्गी न लावल्यास तीव्र आंदोलनाचा ईशारा विरोधी पक्ष नेते दिलीप भागवत यांनी शिवसेना ठाकरे गटाकडून देण्यात आला आहे.

## SPORT

# Sara Tendulkar Joins Sachin Tendulkar Foundation As Director




**New Delhi** - Legendary Indian cricketer Sachin Tendulkar's daughter, Sara Tendulkar, has joined the Sachin Tendulkar Foundation as a director. The 51-year-old cricketer, who holds the record for scoring the most runs in Tests and ODIs, took to X on Wednesday (December 4) to confirm the news of Sara's appointment. Sara, who was born on October 12, 1997, holds a master's degree in clinical and public health nutrition from University College London. "Sara Tendulkar has joined the Sachin Tendulkar Foundation as Director. She holds a Master's degree in Clinical and Public Health Nutrition from University College London. As she embarks on this journey to empower India through sports, healthcare, and education, it serves as a reminder of how global learning can come full circle," Tendulkar tweeted. Tendulkar's son Arjun is a professional cricketer. The 25-year-old represents Goa in domestic cricket, and like his father, Arjun also scored a century on his Ranji Trophy debut. Arjun, who is primarily a left-arm fast bowler, is associated with Mumbai Indians in the Indian Premier League. He made his IPL debut for the Mumbai-based franchise at Wankhede Stadium in Mumbai during the IPL 2023 match played against Kolkata Knight Riders. Arjun was released by MI ahead of the IPL 2025 mega auction, but the Ambani-owned side signed him again for Rs 30 lakh in the mega auction, which was held in Jeddah on November 24 and 25. Arjun, who moved to Goa after not getting a chance to play for Mumbai in the Ranji Trophy, has played a total of 17 First Class, 15 List A, and 24 T20s so far and has 37, 21, and 27 wickets to his name. With the bat, Arjun has hammered 532 runs in red-ball cricket and 62 and 119 runs in List A and T20 matches. Arjun, who is part of Goa's squad for the ongoing 2024 edition of the Syed Mushtaq Ali Trophy, was dropped from the team's playing XI for the second match in a row on Tuesday (December 3). In three matches played so far, Arjun has only managed to take one wicket and scored 21 runs with the bat.

# Babar, Naseem recalled for South Africa tour




**NEw Delhi** - Babar Azam and Naseem Shah have been brought back into the Pakistan Test squad for the forthcoming multi-format tour of South Africa. Interestingly, Shaheen Afridi has been named only in the white-ball squads as part of his workload management to prepare for the Champions Trophy next year. After an innings defeat to England in the first Test in Multan, Pakistan dropped the above-mentioned trio to prepare spin-friendly wickets, and managed to turn over England in the remaining two matches. Babar, skipper Mohammad Rizwan, Salman Ali Agha and Saim Ayub are the only players to feature in all three squads. The other players to return to the Test squad are Mohammad Abbas, Khurram Shahzad and Mir Hamza. Offspinner Sajid Khan, who was named Player of the Series against England in October, was left out as Pakistan opted for the lone spinner in Noman Ali. This decision was taken on the basis of conditions expected in Cape Town and Centurion. Abbas, who last played for Pakistan in August 2021, has had an outstanding Quaid-e-Azam Trophy as he picked 31 wickets in five games this season for Lahore B. Shahzad too will come into the two-match series in good form as he scalped 15 wickets for Pakistan Shaheens against Sri Lanka A last month. Meanwhile, for the ODI squad, Sufiyan Muqeem has earned his maiden call-up to the ODI squad for the first time. He has picked up eight wickets so far in the ongoing T20I series against Zimbabwe in two matches including career best figures of 5 for 3 in the second game. The Pakistan T20I squad will travel directly to South Africa from Zimbabwe after the completion of the third match on December 6 while the Test squad will reach on December 13.

# India's Harvansh Singh replicates MS Dhoni-style run-out in U19 Asia Cup



**New Delhi** - India U-19 wicketkeeper Harvansh Singh sent fans into a wave of nostalgia with his remarkable skills during the U19 Asia Cup match against the UAE at the Sharjah Cricket Stadium on December 4, Wednesday. Harvansh's quick reflexes and unique wicketkeeping style drew immediate comparisons to former India captain and legendary wicketkeeper MS Dhoni. The UAE U19 team opted to bat first after winning the toss. During their innings, Harvansh produced a moment of brilliance that left spectators and commentators in awe. A UAE batter played a shot that was stopped near the boundary by the Indian fielders, who quickly returned the ball to Harvansh. What followed was a Dhoni-esque moment—Harvansh collected the ball and, without looking at the stumps, attempted a no-look run-out. Although the UAE batter had already made it safely to the crease, Harvansh was praised for his exceptional awareness and sharp reflexes behind the wickets. His effort reminded cricket fans of Dhoni's iconic no-look run-out attempts that have become a part of cricketing folklore.

# Sir Don Bradman's 'baggy green' cap gets auctioned for Rs 2.63 crore in Sydney

**New Delhi** - egendary Australia cricketer Sir Don Bradman's 'baggy green' cap was sold at an auction in Sydney at Bonhams auction house on Tuesday, December 3. The cap which was worn by Bradman during his last Test series in Australia played against India in 1947-48, was bought for a price of $390,000 (Rs 2.14 crore). The fee was further increased to $479,700 (Rs 2.63 crore) after buyer's premium was added.

Bradman is considered as the greatest batter to have played the game having scored 6996 runs from 52 Test matches with 29 hundreds and 13 fifties. The legendary batter holds the record for most double hundreds in the longest format (12) and also the joint highest triple centuries (2).



The auctioned cap was worn by the legendary batter during India's first tour to Australia after independence. Bradman was seen in imperious form during the series as he brought up his 100th first class hundred. The right-handed batter scored 715 runs from six innings at an average of 178.75 registering three centuries out of which one was converted into a double century.

The cap is also the only known Baggy Green surviving from the series which was gifted by Bradman gave to the then Indian team manager who handed it to the wicket keeper on that tour. The cap was purchased by a collector decades later who loaned it to the Bradman museum. Legendary India cricketer Sunil Gavaskar also shared an incident when his club captain came to Australia and insisted on meeting Bradman and revealed how much is the legendary batter revered in India.

# Prithvi Shaw Asked To Learn From Virat Kohli After Comparison With Sachin Tendulkar: 'Clearly Ignored His Fitness'

**New Delhi** - Harbhajan Singh reckons Prithvi Shaw needs to back himself if he wants to come out of his lean patch. Once regarded as one of the brightest prospects in Indian cricket, Shaw has suffered a series of setbacks including going unsold at the recent IPL mega auction last month. Shaw made his debut in the T20 competition in 2018 and since then, this is the first time he has failed to secure a contract. Despite a dip in form, there have been reports over coaches unhappy with his attitude. Amidst the criticism, Harbhajan has sympathised with the young cricketer.

"I don't know what happened, but whatever did, I feel this is something Prithvi Shaw will need to take stock of and decide how to approach his career going forward. Such things either make or break a career and it's up to Shaw to decide which road he wants to take," Harbhajan said.

"It's very tough for any player to digest that he's gone unsold at the auction. And this is a player who people said is as talented as (Sachin) Tendulkar. Our problem is that they started comparing him so early with a player as big as Sachin," he added.

Harbhajan believes Shaw is too young to be held back by controversies.




According to the World Cup winner, the 25-year-old should learn from his mistakes and concentrate more on his fitness to get back in shape.

"I wish him well. I hope he emerges out of this setback stronger, work hard on his fitness. He's a very young guy. Must be around 24-25. He can go a long way if he focuses on his fitness. Because the Prithvi Shaw that we saw and the version of him we are seeing now – even size-wise – he clearly has ignored his fitness," Harbhajan opined.

Explaining how Shaw could regain his form, the ex-cricketer suggested, "Look at the fitness of Team India players and it reflects on the ground. If he needs to look up to someone, make sure it's Virat Kohli. I wish Shaw all the best so the next generation can also learn from him."

Shaw has represented India in five Tests, six ODIs and one T20I to accumulate 528 runs across formats. He last represented India in July 2021, featuring in a 20-over clash against Sri Lanka in Colombo.

The Mumbai batter previously had struck a record-breaking 379 against Assam in the Ranji Trophy 2022-23. Shaw also impressed on his debut for Northamptonshire in the One-Day Cup 2024, registering 244 runs. Despite these, he appeared out of form in the 2024 IPL, managing just 198 runs in eight appearances.

# डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'महापरिनिर्वाण दिनानिमित्त' 'माहिती व जनसंपर्क'तर्फे अनोखी मानवंदना



● मुंबई, यश सावंत :

भारतीय राज्यघटनेचे शिल्पकार, भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या 'महापरिनिर्वाण दिनानिमित्त' शुक्रवार, दि. ६ डिसेंबर २०२४ रोजी डॉ. आंबेडकर यांच्या जीवनचरित्रावर आधारित दोन माहितीपटांसह आणि चित्रपटाचे माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवरून प्रसारण करण्यात येणार आहे. या कार्यक्रमांच्या माध्यमातून महासंचालनालयातर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना अनोखी मानवंदना देण्यात येणार आहे.

## माहितीपट आणि चित्रपटाचे महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवरुन प्रसारण होणार

'महापुरुष डॉ.आंबेडकर' या माहितीपटाचे प्रसारण सकाळी ११ वा. आणि 'बाबासाहेब आंबेडकर' या माहितीपटाचे प्रसारण दुपारी १ वाजता तसेच 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर : द अनटोल्ड ट्रुथ' या चित्रपटाचे प्रसारण दुपारी ४ वाजता करण्यात येणार आहे. माहितीपट व चित्रपटाच्या प्रसारणाच्या माध्यमातून महासंचालनालयाने डॉ. आंबेडकर यांना अनोखी आदरांजली वाहिली आहे.

महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांच्या पुढील लिंकवर हे कार्यक्रम पाहता येतील.

एक्स - https://x.com/MahaDGIPR

फेसबुक - https://www.facebook.com/MahaDGIPR

यू ट्यूब - https://www.youtube.co/MA_HARASHTRADGIPR

'महापुरुष डॉ. आंबेडकर' माहितीपटाचे सकाळी ११ वा. प्रसारण

'महापुरुष डॉ. आंबेडकर' या दुर्मिळ माहितीपटाचे प्रसारण सकाळी ११ वाजता. महासंचालनालयाच्या एक्स, फेसबुक आणि युट्यूब या समाजमाध्यमांवरुन करण्यात येणार आहे. डॉ. आंबेडकर यांच्या आयुष्यातील महत्त्वाच्या घटनांचे चित्रण तसेच, लाईव्ह फुटेजच्या चित्रीकरणाचा समावेश या १७ मिनिटांच्या माहितीपटात करण्यात आला आहे. डॉ. आंबेडकरांच्या आयुष्यावर प्रकाश टाकणारा एक महत्त्वाचा ऐतिहासिक दस्तावेज जुलै १९६८ मध्ये माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने फिल्म्स डिव्हिजनच्या माध्यमातून तयार केला आहे.

या माहितीपटात डॉ. आंबेडकर यांनी बौद्ध धर्माचा स्वीकार केल्याची ऐतिहासिक घटना दृश्य आणि त्यांची नेपाळ भेट तसेच मुंबईतील दादर चौपाटीवरील त्यांच्या अंतिम दर्शनाचे क्लोजअप शॉट्स आहेत. मधुकर खामकर यांनी छायांकन केले आहे. जी.जी. पाटील यांनी संकलन केले आहे. दिग्दर्शक नामदेव व्हटकर हे मराठी चित्रपटसृष्टीतील दिग्गज अभिनेते आणि दिग्दर्शक होते. हा दुर्मिळ माहितीपट व्हटकर प्रॉडक्शनच्या बॅनरखाली नामदेव व्हटकर यांनी दिग्दर्शित केला आहे. तर संगीत दत्ता डावजेकर यांचे आहे. ज्येष्ठ चित्रपट कलाकार डेव्हिड अब्राहम या चित्रपटाचे निवेदक होते.

'बाबासाहेब आंबेडकर' माहितीपटाचे दुपारी १ वा. प्रसारण

भारत सरकारच्या 'फिल्म्स डिव्हिजन' ची निर्मिती असलेल्या 'बाबासाहेब आंबेडकर' या माहितीपटाचे प्रसारण दुपारी १ वाजता महासंचालनालयाच्या एक्स, फेसबुक आणि युट्यूब या समाजमाध्यमांवरुन करण्यात येणार आहे.

# आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस कार्यक्रमाचे १० डिसेंबर रोजी आयोजन


## विविध तज्ज्ञांचे मार्गदर्शन व माहितीचे स्टॉल

● मुंबई, राकेश गायकवाड :

आंतरराष्ट्रीय मानवी हक्क दिवस दरवर्षी १० डिसेंबर रोजी साजरा करण्यात येतो. या वर्षाची संकल्पना (अवर राईट्स अवर फ्युचर राईट नाऊ) अशी आहे. यानिमित्त आयोजित राजभवन येथील दरबार हॉलमध्ये राज्यपाल सी.पी राधाकृष्णन यांच्या अध्यक्षतेखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. यावेळी प्रमुख उपस्थिती निवृत्त न्यायाधीश एन.एच पाटील यांची असणार आहे. या कार्यक्रमात पद्मश्री शंकरबाबा पापळकर (रा. अचलपूर, जि. अमरावती) हे अनाथ विकलांग मुलांच्या जीवनाच्या पुनर्वसन या विषयावर, टाटा इन्स्टिट्यूट ऑफ सोशल सायन्सच्या सहायक प्राध्यापक डॉ. वैशाली कोल्हे दिव्यांग व्यक्तींचे हक्क, एनजीओचे श्रीरंग बिजूर ऑटीझम / एएसडी दिव्यांगाचे हक्क या विषयावर, हेल्पेज इंडिया संस्थेचे सहसंचालक व्हॅलेरिअन पैस ज्येष्ठ नागरिकांच्या प्रश्नावर मार्गदर्शन करणार आहेत. तसेच अंकुर ट्रस्टच्या सचिव डॉ. वैशाली पाटील आदिवासी कातकरी जमातीतील ज्येष्ठ नागरिकांचे प्रश्न या विषयावर, वाशिम येथील फार्मलॅब येरंडा ॲग्रोसोल्युशन प्रोड्युसर कंपनीचे संचालक संतोष चव्हाण शेतीतील खर्च कमी कसा करावा या विषयावर, बीआयएफ कंपनीचे अधिकारी संजय पाटील हे शेतीतील जैव विविधता व समाजातील हक्क या विषयावर संबोधीत करतील. कार्यक्रमादरम्यान महाराष्ट्र राज्य मानवी हक्क आयोगाच्या २०२४ सोव्हिनिरचे प्रकाशन करण्यात येणार आहे. कार्यक्रमात संपूर्ण राज्यातील ३५० विविध क्षेत्रात उल्लेखनिय काम करणारे व्यक्ती सहभागी होणार आहे. तसेच कार्यक्रम ठिकाणी बांधावरील प्रयोगशाळा, आहार हेच औषध, महिला व मुलांची देह विक्रीबाबत जनजागृती, दिव्यांग व ज्येष्ठ नागरीक यांच्यासाठी कार्य करणाऱ्या संस्थांच्या माहितीवर व आदिवासी भागातील समस्या व त्यांचे हक्काबाबत जनजागृती करणारे स्टॉलही असणार आहे.

# कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रावर 'फेंगल' चक्रीवादळाचा परिणाम

● नागपूर, नितीन देवळेकर :



'फेंगल' चक्रीवादळ महाराष्ट्रावर परिणाम करणार नाही, असाच अंदाज तो येईपर्यंत दिला जात होता. मात्र, आता या चक्रीवादळाचा परिणाम महाराष्ट्रावर जाणवू लागला आहे. राज्यातील हवामान सध्या चांगलेच बदलले असून या हवामानाला आता लोकही कंटाळले आहेत. या स्थितीत सूर्याचे क्वचितच दर्शन होत आहे. दरम्यान हवामान खात्याने येत्या तीन दिवसात हवामानात आणखी बदल होण्याची शक्यता वर्तवली आहे. सद्यस्थितीत कोकण आणि पश्चिम महाराष्ट्रावर चक्रीवादळाचा परिणाम जाणवत आहे.

कोकणातील रायगड, रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह सोसाट्याच्या वारा आणि मेघगर्जनेसह पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. त्यामुळे कोकणाला सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे. पश्चिम महाराष्ट्रात देखील उद्यापासून म्हणजेच गुरुवारपासून पावसाचा 'यलो अलर्ट' देण्यात आला आहे. येथेही जोरदार वारा, विजांचा कडकडाट आणि मध्यम स्वरुपाच्या पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. मराठवाड्यातील लातूर, नांदेड, धाराशिव जिल्ह्यात पुढील पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. नोव्हेंबर महिन्याच्या अखेरीस राज्याच्या अनेक भागातील किमान तापमानात मोठ्या प्रमाणात घसरण झाली होती. अनेक जिल्ह्यांमध्ये किमान तापमान दहा अंश सेल्सिअसच्या आत होते. मात्र, 'फेंगल' चक्रीवादळाने गणित पूर्णपणे पालटले. आता तर डिसेंबर उजाडला, पण दहा अंश सेल्सिअसवर गेलेले किमान तापमान आत २० अंशावर पोहोचले आहे. गेल्या तीन-चार दिवसांपासून सूर्यनारायण जराही दिसून येत नाही. अध्येमध्ये कधीतरी सूर्याचे दर्शन होते, पण ते अवघ्या काही मिनिटांकरिताच असते. डिसेंबर महिन्यात या हवामानात बदल होईल, पण जशी शक्यता होती, तशी थंडी पडण्याची सुतराम शक्यता नाही.

हवामान खात्याच्या माहितीनुसार, डिसेंबरमध्ये हवामानाचे स्वरूप बदलेल अशी शक्यता आहे. थंडी आता सुरु होणार आहे. पण मागील वर्षांच्या तुलनेत यंदा थंडी कमी राहण्याची शक्यता आहे. डिसेंबरमध्ये तापमानात घट होण्याची शक्यता आहे. त्यामुळे थंडी वाढणार आहे असा अंदाज हवामान खात्याने व्यक्त केला. पण देशातील बहुतांश भागात किमान तापमान सामान्यपेक्षा जास्त राहण्याची शक्यता आहे. पण यंदा कमी थंडीची लाट येण्याची शक्यता आहे.

# गोवा शांतता, एकोप्याचे प्रतीक - मुख्यमंत्री सावंत

● पणजी, दिगंबर जाधव :



यंदा सेंट फ्रान्सिस झेवियर शवदर्शन सोहळा आयोजित केला असून त्याची सुरुवात २१ नोव्हेंबर पासून झाली आहे. सरकारने या आयोजनासाठी केलेल्या तयारीचा चर्चचे फादर, कार्डिनल यांनीही कौतूक केले आहे. आंतरराष्ट्रीय स्तरावरील हा सोहळा आहे. गोवा हा शांती, निसर्ग तसेच एकोप्यासाठी ओळखला जातो. गोवा त्याचे प्रतिक आहे. हिंदू, ख्रिश्चन, मुस्लिम सर्व धर्मिय एकोप्याने राहतात. हाच खरा गोवा असून आम्ही सर्वजण एक असून हाच संदेश सेंट फ्रान्सिस झेव्हियर यांच्या फेस्ताद्वारे दिला जात असल्याचे मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत यांनी सांगितले.

जुने गोवे येथील सेंट फ्रान्सिस झेवियर यांच्या फेस्तला मंगळवारी हजाको भाविकांच्या उपस्थितीत सुरुवात झाली. या फेस्तनिमित बॅसिलिका ऑफ बॉम जिजस चर्च परिसर भाविकांनी अक्षरशः व्यापून गेला होता. फेस्तच्या पार्श्वभूमीवर कुठलीही अनुचित घटना घडू नये यासाठी चोख पोलिस बंदोबस्त ठेवला आहे. यात सशस्त्र पोलिसांचाही समावेश आहे. भाविकांची तेथे मेटल डिटेक्टरद्वारे तपासणी करुनच त्यांना चर्चच्या आत सोडले जात आहे. शवदर्शन सोहळा आणि फेस्तसाठी एक हजारांहून अधिक पोलिस तैनात केले आहेत.

गोंयच्या सायबाच्या फेस्तची मुख्य प्रार्थना सभा सकाळी बॅसिलिका ऑफ बॉम जिजस चर्च परिसरात झाली. त्याला राज्यपाल पी. एस श्रीधरन पिल्लई, मुख्यमंत्री डॉ. प्रमोद सावंत, गोवा फॉरवर्डचे अध्यक्ष आमदार विजय सरदेसाई, मंत्री माविन गुदिन्हो, विरोधी पक्षनेते युरी आलेमाव, कॉग्रेस प्रदेशाध्यक्ष अमित पाटकर, आमदार एल्टन डिकॉस्टा, आमदार राजेश फळदेसाई, आमदार ॲड. कार्ल्स फेरेरा, आमदार विरेश बोरकर, माजी उपमुख्यमंत्री बाबू कवळेकर, चर्चिल आलेमाव तसेच इतर मंत्री, आमदार उपस्थित होते. सेंट फ्रान्सिस झेवियर यांच्या शवदर्शनासाठी गोवा सरकार व चर्च दरम्यानचा समन्वय पाहता पोप लवकरच भारताच्या दौऱ्यावर येतील अशी अपेक्षा आहे. त्यांची गोवा भेट अपेक्षित आहे.

# सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन व सागरी डिझेल इंजिन देखभाल आणि परिचालन प्रशिक्षण कार्यक्रम

● मुंबई, विशाल पाटील :



मत्स्यव्यवसायाचा विकास आणि विस्तार होण्याच्या दृष्टीकोनातून, मत्स्यव्यवसायातील इच्छुक प्रशिक्षणार्थींना सागरी मत्स्यव्यवसाय, नौकानयन व सागरी डिझेल इंजिन देखभाल आणि परिचालन हे सहा महिन्याचे प्रशिक्षण १ जानेवारी २०२५ ते ३० जून २०२५ या कालावधीत देण्यात येणार आहे. या १३३ व्या सत्राचे प्रशिक्षण मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र वर्सोवा, मुंबई उपनगर येथे आयोजित करण्यात आले असल्याचे मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी, वर्सोवा यांनी कळविले आहे. इच्छुकांनी २४ डिसेंबर पर्यंत अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. या प्रशिक्षण केंद्रातून मत्स्यव्यवसाय, नौकानयनाची मूलतत्वे, सागरी डिझेल इंजिनाच्या निरनिराळ्या भागाची माहिती व दुरुस्ती, मासेमारीची आधुनिक साधने, प्रात्याक्षिक इत्यादीचे प्रशिक्षण दिले जाते. या प्रशिक्षणासाठी दारिद्र्य रेषेवरील प्रशिक्षणार्थीकडून प्रतिमहिना रूपये ४५०/-, दारिद्र्य रेषेखालील प्रशिक्षणार्थीकडून रूपये १००/- शुल्क आकारले जाते. या प्रशिक्षणासाठी पात्र प्रशिक्षणार्थी निकष खालीलप्रमाणे आहेत.

१) प्रशिक्षणार्थी क्रियाशील मच्छिमार व प्रकृतीने सुदृढ असणे आवश्यक आहे. २) प्रशिक्षणार्थी १८ ते ३५ वयोगटातील असावा. ३) प्रशिक्षणार्थीस पोहता येणे आवश्यक आहे. ४) ) प्रशिक्षणार्थी किमान इयत्ता ४ थी उत्तीर्ण असणे आवश्यक आहे. ५) प्रशिक्षणार्थीस मासेमारीचा किमान २ वर्षाचा अनुभव असणे आवश्यक आहे. 6) प्रशिक्षणार्थी बायोमेट्रिक कार्डधारक / आधारकार्डधारक असावा. 7) प्रशिक्षणार्थीचा विहित नमुन्यात परिपूर्ण अर्ज असावा व त्या अर्जावर संबंधीत मच्छिमार संस्थेची शिफारस असणे आवश्यक असून 8) प्रशिक्षणार्थी दारिद्र्यरेषेखालील असल्यास, अर्जासोबत त्याबाबतचे प्रमाणपत्र, संबंधीत गट विकास अधिकारी यांच्या दाखल्यांची स्वाक्षांकीत प्रत जोडणे आवश्यक आहे.

या आयोजित प्रशिक्षणासाठी निकषांची पूर्तता करणाऱ्या मच्छिमारांनी विहित अर्ज आपल्या मच्छिमार सहकारी संस्थेच्या शिफारशींसह मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण केंद्र, पांडुरंग रामले मार्ग, तेरे गल्ली, वर्सोवा, मुंबई-61 येथे 24 डिसेंबर 2024 पर्यंत सादर करावेत. या प्रशिक्षण सत्राच्या अधिक माहितीसाठी सचिन भालेराव, मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी, वर्सोवा, मो. 9920291237 आणि जयहिंद सूर्यवंशी, यांत्रिकी निर्देशक मो. 7507988552 यांचेशी संपर्क साधावा. असे मत्स्यव्यवसाय प्रशिक्षण अधिकारी, वर्सोवा यांनी कळविले आहे.

# पीएमपीकडून नवी पर्यटन बससेवा!

## सुट्टीत एसी बसमधून पाहुण्यांना पुणे दर्शन घडवा मोफत

● पुणे, अभिजीत येरल्लू :



पुण्याच्या पर्यटनाला चालना मिळावी आणि पीएमपीएमएल बससेवाही लोकांच्या पसंतीस उतरावी, यासाठी पीएमपीएमएलने गेल्यावर्षीपासून 'पुणेपर्यटन' ही बससेवा सुरू केली आहे. तसेच दिवाळीत देण्यात आलेल्या पर्यटन सेवेला मिळालेला चांगला प्रतिसाद पाहून आता प्रशासनाने नव्या योजना अमलात आणल्या आहेत. त्यात ३३ प्रवाशांनी ग्रुप तिकीट काढल्यास ५ प्रवाशांच्या तिकीट दरात तब्बल १०० टक्के सवलत देण्यात येणार आहे. पुण्यातील पर्यटनासाठी स्मार्ट एसी इलेक्ट्रिक बसेसची सेवा सुरू केली आहे. इलेक्ट्रिक बसमुळे पर्यावरणपूरक प्रवासाला चालना मिळणार असून, इलेक्ट्रिक बसेसमुळे प्रवाशांना अत्यंत आरामदायी प्रवासाचा अनुभव मिळणार आहे. याशिवाय वायू प्रदूषणमुक्त प्रवास आणि इंधन खर्चातही बचत होणार आहे. पुणेकरांकडे येणाऱ्या पाहुण्यांना पुण्याचे पर्यटन घडवून आणण्यासाठी 'पीएमपीएमएल'ची ही सेवा सोयीची ठरणार आहे. आठवड्याच्या सुट्टीसह शनिवार-रविवारी ही सेवा असणार आहे; मात्र विशेष मागणी आणि बुकिंग असेल तर इतर दिवशीही ही सेवा उपलब्ध करून देण्यात येणार आहे. पुण्याच्या पर्यटन बससेवेबाबत माहिती देताना पीएमपीएमएलचे समन्वयक नितीन गुरव म्हणाले की, पुणे महानगर परिवहन महामंडळाने (पीएमपीएमएल) पर्यटन बससेवेमध्ये ३३ प्रवाशांचे ग्रुप तिकीट काढल्यास ५ प्रवाशांच्या तिकीट दरात १०० टक्के सूट देण्यात येणार आहे. काही कारणास्तव बुकिंगच्या दिवशी बससेवा रद्द झाल्यास त्यांना पुढच्या शनिवारी त्याच तिकिटावर प्रवास करता येणार आहे.

# सायन स्टेशनपर्यंत पॉड टॅक्सीचा विस्तार

## एमएमआरडीए कडून दुसऱ्या टप्प्याबाबत विचार सुरू



● मुंबई, विशाल कारंडे :

कुर्ला - बीकेसी - वांद्रे भागातील वाहतूक कोंडी सोडविण्यासाठी उभारण्यात येत असलेल्या पॉड टॅक्सी प्रकल्पाचा दुसऱ्या टप्प्यात सायन रेल्वे स्टेशनपर्यंत विस्तार केला जाणार आहे. त्यादृष्टीने मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (एमएमआरडीए) विचार सुरू आहे. एमएमआरडीएकडून पॉड टॅक्सी प्रकल्पाची सार्वजनिक - खासगी भागीदारी (पीपीपी) तत्त्वावर या प्रकल्पाची अंमलबजावणी केली जाणार आहे. या प्रकल्पाच्या पहिल्या टप्प्यातील मार्गासाठी हैदराबाद येथील साई ग्रीन मोबिलिटी या कंपनीला १ हजार १६ कोटी रुपयांना कंत्राट देण्यात आले आहे. त्यातून वांद्रे ते कुर्ला या मार्गावर २०२७ मध्ये पॉड टॅक्सी धावण्याची शक्यता वर्तविली जात आहे.

आता एमएमआरडीएकडून दुसऱ्या टप्प्यात पॉड टॅक्सीचा सायन रेल्वे स्टेशनपर्यंत विस्तार करण्याचा विचार सुरू आहे. हा मार्ग धारावीतून जाणार आहे. धारावीचा पुनर्विकास होऊ घातला आहे. त्यानंतर या भागात नव्या वाहतूक व्यवस्थेची गरज पडणार असून, त्या अनुषंगाने एमएमआरडीएकडून या नव्या पर्यायाचा विचार केला जात आहे.